

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २९४ * नांदेड * बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

महाराष्ट्रात पावसाचं सावट; 'मुरासू' चक्रीवादळामुळे कोकण, मराठवाडा अन् मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्याची शक्यता

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढील ४ ते ५ दिवस वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले 'मुरासू' हे चक्रीवादळ तीव्र वेगाने किनारपट्टीच्या दिशेने सरकत असून त्याचे रूपांतर अत्यंत भीषण चक्रीवादळात होण्याची शक्यता आहे. या वादळाचा थेट आणि मुख्य फटका आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला बसणार आहे. तसेच, या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे आणि अरबी समुद्रातील चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीमुळे महाराष्ट्रातील हवामानातही मोठे बदल होणार आहेत.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ५ नोव्हेंबर या कालावधीत महाराष्ट्रातील अनेक भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ६० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. ४ नोव्हेंबरदरम्यान विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडू शकतो, तसेच ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. ६ नोव्हेंबर रोजी काही भागांत विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

आंध्र प्रदेशमध्ये पावसामुळे हजारो झाडे आणि विजेचे खांब कोसळले, ३० विमान उड्डाणे रद्द

आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकलेले मुरासू चक्रीवादळ तेलंगणाच्या दिशेने सरकले आहे. दिलासादायक बाब म्हणजे त्याची तीव्रता ताशी १०० किमीवरून ताशी ६० किमीपर्यंत कमी झाली आहे. चक्रीवादळाचा एक भाग अजूनही आंध्रच्या किनारपट्टीवरून जात असून, त्यामुळे विजयवाडासह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने मंगळवार संध्याकाळपर्यंत सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मंगळवारी रात्री सुमारे १ वाजता मुरासू चक्रीवादळाने आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडक दिली, त्यावेळी वाऱ्याचा वेग ताशी १२० किमीपर्यंत पोहोचला होता. हजारो झाडे उन्मळून पडली आणि शेकडो विजेच्या खांबांचे नुकसान झाले. तसेच अनेक बोटींचेही नुकसान झाले आहे. मुसळधार



पावसामुळे आंध्र प्रदेशातील किनारपट्टीच्या शहरांमध्ये रस्ते पाण्याखाली गेले आणि महामार्गांवर वाहने अडकून पडली. मंगळवारी विजयवाडा, विशाखापट्टणम, तिरुपती आणि चेन्नई विमानतळांवरून तीस देशांतर्गत विमानसेवा रद्द करण्यात आल्या. आंध्र प्रदेशातील काकीनाडा या किनारपट्टीच्या शहरात मुसळधार पावसामुळे सखल भागांत पाणी साचले असून, रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

एकाच ठिकाणी अनिश्चित काळासाठी आंदोलने करता येणार नाहीत -सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– एकाच ठिकाणी अनिश्चित काळासाठी आंदोलन करता येणार नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

एकाच ठिकाणी अनिश्चित काळासाठी धरणे आंदोलन करता येणार नाही. आंदोलन हे केवळ एका व्यक्तीसाठी नसून सर्वांसाठी आहे; रोजगार आणि व्यवसायाचा विचार करणेही महत्त्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, कोणतीही संघटना निदर्शनांसाठी सार्वजनिक जागेवर अनिश्चित काळासाठी कब्जा करू शकत नाही. आंदोलनासाठी निश्चित केलेल्या जागांनाही एक निश्चित कालावधीची मर्यादा असावी, जेणेकरून इतर संघटनांनाही आपली मते मांडण्याची संधी मिळेल. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, तुम्ही एका जागेवर कायमचा कब्जा करू शकत नाही. शेतकरी, पत्रकार, मजूर आणि इतर आंदोलक कुठे जाणार? प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे.

शेतकरी मृत्यूप्रकरणी मोठा बदल; आता अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्याकडे तपास

नांदेड (प्रतिनिधी)– शेतकरी मृत्यूप्रकरणाच्या तपासात मोठा बदल करण्यात आला आहे. या प्रकरणातील एसआयटी प्रमुख असलेले रामेश्वर व्यंजने यांच्याऐवजी या प्रकरणाचा संपूर्ण तपास आता अतिरिक्त अधीक्षक अर्चना पाटील ह्या पाहणार आहेत.

शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगोली गेट ब्रिजजवळील 'केएफ इंटरप्रायझेस' या फायनान्स कंपनीच्या कार्यालयात शेतकरी चंद्रकांत दगडूजी शिंदे (वय ४०, रा. माळकौठा, ता. मुदखेड) यांचा मृतदेह आढळून आल्याच्या गंभीर घटनेच्या सखोल तपासासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्रमुखपदात मोठा बदल करण्यात आला आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी सुरुवातीला उपविभागीय पोलीस अधिकारी (नांदेड शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन करण्यात आली होती. मात्र, आता या प्रकरणाचा संपूर्ण तपास अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

मृत शेतकऱ्याची पत्नी ज्योती चंद्रकांत शिंदे (वय ३७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी माळकौठा गावातील मारोती मंदिराजवळून दोन अनोळखी व्यक्तींनी चंद्रकांत शिंदे यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नांदेड येथील 'केएफ इंटरप्रायझेस'च्या कार्यालयात आणले. तेथे दोन दिवस डांबून ठेवून त्यांना मारहाण करण्यात आल्याचा आरोप होता. या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३३/२०२६ कलम १०३ (१), १४० (१), १४० (२), १४२, १२७ (२) आणि ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या एसआयटी पथकात सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल दुरपडे, बालाजी महाजन, पोलीस उपनिरीक्षक रमेश गायकवाड, पोलीस हवालदार श्याम पांचाळ, व्यंकट गांगुलवार, दिगंबर मुसळे, पोलिस अंमलदार भगवान गीते, भाऊसाहेब राठोड, तानाजी धूटे यांचा समावेश असून, या पथकाच्या कामकाजाचा आढावा अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव घेत होते.

आता या संपूर्ण पथकाचे नेतृत्व अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील करणार आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणात एसआयटी प्रमुख रामेश्वर व्यंजने यांनी अतिशय बारकाईने आणि सूक्ष्म तपास करत नवा आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणावरून अटक केली होती, त्यातील काही आरोपी सध्या कारागृहात तर काही पोलीस कोठडीत आहेत. परंतु हा तपास त्यांच्याकडून काढून घेण्यात यावा, अशी मागणी एका गटाने केल्याने वरिष्ठ पातळीवरून त्यांचा पदभार काढून भोकरच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्याकडे तो सोपविण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यातील आरोपीच्या आत्महत्येचा तपास 'सीआयडी'कडे वर्ग

नांदेड (प्रतिनिधी)– पत्नीच्या खुनाच्या आरोपात अटकेत असलेल्या आरोपीने नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटनेचा तपास आता राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीच्या पोलीस उपअधीक्षक अरुणा सुगावे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

पत्नीचा खून केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आलेल्या आरोपीने पोलीस ठाण्यातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी पहाटे घडली होती. सुशील महाजन हैबते असे मृत आरोपीचे नाव असून, त्याने पत्नी छाया महाजन हैबते हिचा खून केल्याचा आरोप आहे.

धनेगाव येथे वीटभट्टीवर काम करणाऱ्या सुशीलचे पत्नी छायासोबत मागील काही महिन्यांपासून कौटुंबिक कारणावरून वाद सुरू होते. दि. १ नोव्हेंबर रोजी रात्री दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. या वादातून सुशीलने चार महिन्यांची गर्भवती असलेल्या छायाचा गळा दाबून खून केल्याचा आरोप आहे.

घटनेनंतर पोलिसांनी सुशीलला ताब्यात घेतले होते. छायाच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, ताब्यात असतानाच सुशीलने सोमवारी पहाटे चारच्या सुमारास पोलीस ठाण्यात गळफास घेऊन आत्महत्या केली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात धाव घेऊन माहिती घेतली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला असून, आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत सदर प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तपास प्रक्रिया सुरू –सुगावे

याबाबत सीआयडीच्या उपअधीक्षक अरुणा सुगावे यांच्याशी संवाद साधला असता त्या म्हणाल्या, पुणे येथील राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या आदेशानेच हा तपास सुरू आहे. दि. २ नोव्हेंबर रोजी हा तपास सीआयडीकडे वर्ग झाला आहे. घटनास्थळाचा अहवाल प्राप्त झाला असून, पोस्टमॉर्टम रिपोर्ट व इतर अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. अहवाल मिळताच तपासाची प्रक्रिया वेगाने करण्यात येईल. दरम्यान, पोलीस ठाण्यातच आरोपीने आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली असून, सीआयडीच्या तपासात नेमके काय निष्पन्न होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचे लोकार्पण

पुणे (प्रतिनिधी)– मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी देशाचे पंतप्रधान यांच्या हस्ते पुण्यातील हिंजवडी-शिवाजीनगर येथील मेट्रोचे ऑनलाईन पद्धतीने लोकार्पण करण्यात आले.

'देशात यापूर्वी 'गरिबी हटाव'च्या केवळ घोषणाच होत होत्या. अनेक पिढ्या या घोषणांमध्ये वाढल्या. आता मात्र प्रत्यक्षात देशातील गरिबी हटत आहे. गेल्या १०-१२ वर्षांत देशातील ५० कोटी लोकांनी भीषण गरिबीवर मात केली. आपला देश आज वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहेच; पण त्याचबरोबर गरिबी कमी करणारा आघाडीचा देशही आहे,' अशी माहिती देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी दिली. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

पुढे पंतप्रधान मोदी म्हणाले, 'कठीण वैश्विक परीस्थितीतही देशाने विकासाची गती कायम राखली. पूर्वी योजनांचे पैसे भावकीत, भाऊबंदाच्या वाट्यात, घोटाळ्यांमध्ये जात होता. आता मात्र लाभार्थ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा होतात. गरिबांना सशक्त केले, तर त्यांना त्यातून बाहेर पडता येते, हे सिद्ध झाले आहे. नागरिकांचा वेळ वाचतोय. त्यामुळे कुटुंबांसाठी अधिक कमाई करण्याची संधी मिळत आहे.'

'हे परिवर्तन एकदम झाले नाही. यापूर्वीच्या सरकारांनी केवळ घोषणाबाजी केली. आपले सरकार शेतकऱ्यांना, सर्वसामान्यांना पाठबळ देत आहे. देशातील ऊर्जा, महामार्ग, रेल्वेमार्ग, उड्डाणपूल उभारणीसाठी अनेक नव्या योजना आणण्यात येत आहे. विकसित भारत बनविण्यासाठी देशातील प्रत्येक युवकाने आत्मविश्वासाने योगदान द्यायला हवे,' असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात १४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती

मुंबई (प्रतिनिधी)– राज्य सरकारने महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ गटातील १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती आदेश वितरित करण्याचा विशेष समारंभ आज आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

या नियुक्त्यांमुळे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेला मोठे मनुष्यबळ मिळणार असून शासकीय रुग्णालयांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता दूर करण्यास मदत होणार आहे. यामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख करण्यासाठी राज्य सरकारकडून रिक्त पदे भरण्याला प्राधान्य दिले जात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांतील डॉक्टरांची संख्या वाढवणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी ही भरती महत्वपूर्ण ठरणार आहे. राज्यातील वैद्यकीय अधिकारी संवर्गातील एकूण २ हजार ५१४ पदांपैकी १ हजार ४४० पदांसाठी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या भरती प्रक्रियेत ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी अशा एकूण १ हजार ४४० पदांचा समावेश आहे.

एका दिवसात ७२८ फुकटे प्रवासी पकडले, ४.८७ लाख रूपयांचा दंड वसूल; नांदेड रेल्वे विभागाची कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबवली. या विशेष मोहिमेत नांदेड विभागातील सर्व तिकीट तपासणी पथकांनी सक्रिय सहभाग घेतला.

ही मोहीम सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमार यांच्या देखरेखीखाली राबवण्यात आली. मोहिमेत ३३ तिकीट तपासणी कर्मचारी आणि २ आरपीएफ जवान सहभागी झाले होते. पथकाने एकूण २६ गाड्यांमध्ये तपासणी केली.

या मोहिमेत देवगिरी एक्स्प्रेस, नंदीग्राम एक्स्प्रेस, राज्यराणी एक्स्प्रेस,



श्री गंगानगर एक्स्प्रेस, सचखंड एक्स्प्रेस, कृष्णा एक्स्प्रेस, बेंगळुरू एक्स्प्रेस आणि वंदे भारत एक्स्प्रेससह विविध गाड्यांची तपासणी करण्यात आली.

या तपासणीत विनातिकीट आणि अनियमित प्रवासाची एकूण ७२८ प्रकरणे आढळली असून त्यातून ४ लाख ८७ हजार १२० रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. यामध्ये विनातिकीट प्रवास ३९३ प्रकरणे - भाडे रु. १ लाख ७८ हजार ८२५ + दंड रुपये १ लाख ९७ हजार १३०, अनियमित प्रवास : ९६ प्रकरणे - भाडे रु. २६ हजार १२० + दंड ४८ हजार, विना-बुक लगेज २३९ प्रकरणात दंड रूपये ३७,०४५ असा एकूण महसूल ४ लाख ८७ हजार १२० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही मोहीम नांदेड ते आदिलाबाद, पूर्णा ते अकोला, परभणी ते परळी तसेच परभणी ते मनमाड या मार्गांवर राबवण्यात आली.


प्रवाशांनी नेहमी वैध तिकीट घेऊनच प्रवास करावा. अनधिकृत व्यक्तींकडून तिकीट खरेदी करू नये तसेच दुसऱ्याच्या तिकिटावर प्रवास करू नये. विनातिकीट प्रवास करणे दंडनीय असून रेल्वे नियमानुसार कारवाई केली जाते. वैध तिकीटासह प्रवास करा आणि सुरक्षित व सुलभ रेल्वे प्रवासासाठी सहकार्य करा, असे आवाहन नांदेड विभागीय रेल्वे प्रशासनाने केले आहे.

'मुरासू' चक्रीवादळामुळे काही गाड्या उशिराने तर काहींचा मार्ग बदलला

नांदेड (प्रतिनिधी)– 'मुरासू' चक्रीवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मध्य रेल्वेने काही रेल्वेगाड्यांच्या वेळेत आणि मार्गात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्र. १७६३८ तिरुचानूर - जालना ही गाडी दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी तिरुचानूर येथून ३६० मिनिटे (६ तास) उशिराने सुटेल. गाडी क्र. १७४०५ तिरुपती - आदिलाबाद ही गाडी तिचा मूळ मार्ग सोडून रेनिगुंटा, गुटी, गुंतकल, रायचूर, सुलेहल्ली, विकाराबाद, सिकंदराबाद आणि बोलारम या परावर्तित मार्गाने धावेल. तसेच मूळ मार्गावरील रेनिगुंटा ते बोलारम दरम्यानचे सर्व थांबे रद्द करण्यात आले आहेत.

प्रवाशांनी वरील बदलांची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत करण्यात येत आहे.



बीडमध्ये बोअरवेलचे अनाधिकृत खोदकाम केल्यास थेट गुन्हा दाखल होणार

बीड (प्रतिनिधी)– बीड जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा अत्यंत कमी पर्जन्यमान झाले असून जिल्ह्याला तीव्र दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे आहे. जून ते सप्टेंबर या मुख्य मान्सून हंगामात जिल्ह्यात पावसाची मोठी तूट नोंदवली गेली आहे. परिणामी भूजल पाणी पातळीत ४.५ मीटर इतकी मोठी घट झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला असून बोअरवेल खोदण्यासाठी आता निर्बंध घालण्यात आले आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यात आता बोअरवेल घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांची पूर्व लेखी परवानगी घेणे बंधनकारक असेल. तहसील कार्यालयामार्फत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागणार आहे. तर ६० मीटर पेक्षा म्हणजे २०० फुटापेक्षा अधिक खोल बोरवेल घेण्यास परवानगी दिली जाणार नाहीये. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्तोत्रापासून ५०० मीटरच्या आत पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी बोरवेल खोदकामास परवानगी दिली जाणार नाही. तर सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी आवश्यक असलेल्या कूप नलिका प्रस्तावांना सात दिवसाच्या आत निर्णय द्यावा लागणार आहे. अशी देखील माहिती आहे.

किनवटच्या महाघोटाळ्याची रक्कम २० कोटी रूपयांच्या घरात!

आणखी २ कोटी १३ लाख उचलल्याचे उघड; तीन योजनांतील ४२ लाभार्थ्यांच्या नावावर ४५ नोंदी



किनवट (प्रतिनिधी)– किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कथित आर्थिक महाघोटाळ्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, आता घोटाळ्याच्या रकमेत आणखी २ कोटी १३ लाख रुपयांची भर पडली आहे. सुरुवातीला १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयांचा निधी अपहार झाल्याचे उघड झाले होते. त्यानंतर विविध तपासांतून नवीन आर्थिक व्यवहार समोर आल्याने घोटाळ्याची एकूण रक्कम आता १९ कोटी ५० लाखांच्या घरात पोहोचली आहे. त्यामुळे हा महाघोटाळा लवकरच कोटीच्या कोटी उड्डाणे घेण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील महाघोटाळा उघड झाल्यानंतर सहायक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी बी.सरवणन यांच्या आदेशाने सहायक प्रकल्प अधिकारी प्रेमसिंग आडे यांनी पोलिसांत तक्रार दिली होती. या संवेदनशील प्रकरणाचा तपास नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. त्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेने मुख्य सूत्रधार तथा रोखपाल भगवान डवरे आणि कंत्राटी संगणक चालक संतोष मारपवार यांना तर त्यानंतर इतर सहा अशा एकूण ८ आरोपींना अटक केली आहे. आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, विभागीय कार्यालय अमरावती, (पान ३ वर...)

'सबळ पुराव्याशिवाय कुणावरही कारवाई नाही'

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील आर्थिक गैरव्यवहाराची व्याप्ती मोठी असून, या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. तपासादरम्यान प्रत्येक आर्थिक व्यवहाराची पडताळणी केली जात आहे. आमच्या हाती सबळ पुरावे असल्याशिवाय कुणावरही कारवाई केली जाणार नाही, अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी दिली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

कृत्रिम बुद्धिमत्ता: शाप की वरदान?

एकेकाळी 'विज्ञान शाप की वरदान' अशा प्रकारचा निबंध विद्यार्थ्यांना लिहिण्यासाठी दिला जात असे. आता मात्र ही परिस्थिती 'कृत्रिम बुद्धिमत्ता शाप की वरदान' इथपर्यंत बिकट झाली आहे. कारण आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवी प्रगतीचे अत्यंत प्रभावी साधन ठरत असतानाच त्याच्या अनियंत्रित वापराचे धोकेही दिवसेंदिवस स्पष्ट होत आहेत. एआयमुळे वैद्यकीय संशोधन, शिक्षण, उद्योग, वाहतूक, प्रशासन आणि दैनंदिन जीवनातील अनेक कामे अधिक वेगवान आणि सुलभ झाली आहेत. परंतु याच तंत्रज्ञानाचा वापर युद्ध, पाळत ठेवणे, लक्ष्य निश्चित करणे आणि मोठ्या प्रमाणावर विनाश घडवून आणण्यासाठी होऊ लागला, तर मानवजातीसमोर अभूतपूर्व संकट उभे राहू शकते. मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी व्यक्त केलेली ही चिंता त्यामुळे गांभीर्याने घेण्याची गरज आहे. एआयवर वेळीच नियंत्रण आणि प्रभावी नियमन केले नाही, तर त्याचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर मानवी जीवितहानी घडवून आणू शकतो, असा इशारा गेट्स यांनी दिला आहे. एआय अत्यंत शक्तिशाली होत असताना तो चुकीच्या हातात गेल्यास त्याचे परिणाम किती व्यापक असू शकतात, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. हा इशारा केवळ एका तंत्रज्ञान उद्योजकाची भीती म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कारण एआयच्या विकासाचा वेग आणि त्याचा समाजातील विस्तार यांची तुलना केली तर नियमनाची यंत्रणा त्यामागे किती मागे आहे, हा मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. विशेषतः युद्धभूमीवर एआयचा वाढता वापर चिंताजनक आहे. लक्ष्य ओळखणे, माहितीचे विश्लेषण करणे, ड्रोन किंवा इतर स्वयंचलित प्रणालींच्या वापराला मदत करणे अशा विविध क्षेत्रांत एआयचा उपयोग होत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. युद्धात मानवी निर्णयप्रक्रियेची जागा अल्गोरिदम घेऊ लागली तर चुकीच्या माहितीवर आधारित निर्णयाचे परिणाम थेट मानवी जीवावर होऊ शकतात. युद्धाच्या काळात काही सेकंदांत घेतलेला चुकीचा निर्णय शेकडो किंवा हजारो लोकांच्या जीविताला कारणीभूत ठरू शकतो. याहून गंभीर बाब म्हणजे एआयचा जैविक आणि आण्विक सुरक्षेशी संबंधित क्षेत्रात होणारा संभाव्य दुरुपयोग. काही तज्ज्ञांनी एआयचा वापर जैविक शस्त्रे विकसित करण्यासाठी किंवा अत्यंत धोकादायक वैज्ञानिक माहितीचा गैरवापर करण्यासाठी होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली आहे. अर्थात प्रत्येक भीती प्रत्यक्षात येईलच असे नाही. परंतु एखाद्या तंत्रज्ञानाच्या संभाव्य धोक्यांची कल्पना आधीच येत असेल, तर संकट निर्माण झाल्यानंतर उपाय शोधण्यापेक्षा प्रतिबंधात्मक व्यवस्था उभारणे अधिक शहाणपणाचे ठरेल. एआयच्या वापराचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नागरिकांवरील पाळत. स्थलांतरितांवर नजर ठेवणे, त्यांची ओळख पटवणे, त्यांच्या हालचालींचे विश्लेषण करणे किंवा प्रशासनाच्या निर्णयांना एआयच्या साहाय्याने गती देणे यामुळे कार्यक्षमता वाढू शकते; मात्र त्याच वेळी वैयक्तिक स्वातंत्र्य आणि गोपनीयतेचे प्रश्नही निर्माण होतात. एखाद्या व्यक्तीविषयी चुकीची माहिती एआय प्रणालीने तयार केली आणि त्यावर सरकारी कारवाई झाली, तर त्या व्यक्तीला न्याय मिळवून देण्याची जबाबदारी कोणाची? हा प्रश्न अद्याप पुरेसा स्पष्ट झालेला नाही. एआयच्या विकासाला पूर्णपणे थांबविणे हा व्यवहार्य उपाय नाही. मानवाच्या प्रगतीसाठी या तंत्रज्ञानामध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यामुळे प्रश्न एआय असावा की नसावा, असा नसून एआयचा वापर कोणत्या मर्यादेत, कोणाच्या नियंत्रणाखाली आणि कोणत्या जबाबदारीने केला जावा, हा आहे. सरकारांनी एआयसाठी स्पष्ट कायदे आणि आंतरराष्ट्रीय नियम तयार करण्याची गरज आहे. युद्धामध्ये स्वायत्त शस्त्रप्रणालींच्या वापरावर मानवी नियंत्रण अनिवार्य असावे. नागरिकांच्या वैयक्तिक माहितीच्या वापराबाबत कठोर नियम असावेत. एआयच्या निर्णयांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि मानवी पुनरावलोकनाची व्यवस्था असली पाहिजे. एखाद्या एआय प्रणालीच्या चुकीमुळे हानी झाल्यास जबाबदार कोण, याचे कायदेशीर उत्तरही निश्चित झाले पाहिजे. तंत्रज्ञान कंपन्यांची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. केवळ स्वतःहून तयार केलेल्या आचारसंहितेवर विसंबून राहणे पुरेसे नाही. कंपन्यांनी सुरक्षिततेला व्यावसायिक वेगापेक्षा प्राधान्य देणे आवश्यक आहे. स्वतंत्र सुरक्षा चाचण्या, जोखमीचे मूल्यमापन आणि गैरवापर रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी लागेल. एआय ही दुधारी तलवारीसारखी आहे, ती संरक्षणासाठीही वापरता येते आणि विनाशासाठीही. त्यामुळे तंत्रज्ञानाला दोष देण्यापेक्षा त्याचा वापर नियंत्रित करणारी मानवी व्यवस्था मजबूत करणे महत्त्वाचे आहे. आज एआयच्या धोक्यांकडे दुर्लक्ष केले तर उद्या त्याचे परिणाम हाताबाहेर गेलेले असू शकतात. एआयच्या विकासाला विरोध नव्हे, तर जबाबदार विकासाची चौकट ही काळाची गरज आहे. मानवाने निर्माण केलेले तंत्रज्ञान मानवाच्याच नियंत्रणात राहिले पाहिजे; अन्यथा प्रगतीचे साधन कधी विनाशाचे शस्त्र बनेल हे सांगता येणार नाही.

अन्यायी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारणारे आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके



वासुदेव बळवंत फाडके यांचा जन्म शिरढोण येथे ४ नोव्हेंबर १८४५ या दिवशी झाला. त्यांचे आजोबा अनंतराव हे स्वराज्यात जवळच्या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. १८१८ मध्ये इंग्रजांनी तो त्यांना रिकामा करून देण्यास सांगितले. ते नाकारून त्यांनी इंग्रजांशी सतत तीन दिवस लढाई लढली. अशा आजोबांच्या स्वातंत्र्य प्रीतीचा वारसा घेऊन वासुदेव जन्माला आले. वैभवात जन्मलेले वासुदेव गोर्यापान वर्णाचे, सरळ नाकाचे आणि पाणीदार निळसर डोळ्यांचे आणि सुदृढ शरीरयष्टी असलेला खंदे वीर होते. शिक्षणानंतर मुंबईत जी.आय.पी. रेल्वेत ग्रँट मेडीकल महाविद्यालयात वासुदेवांनी काही काळ नोकरी केली; पण वरिष्ठांशी खटका उडाल्याने त्यांना ती नोकरी सोडली आणि मिलीटरी फायनान्स ऑफीस-मध्ये नोकरी धरली. १८६५ या वर्षी त्यांची पुण्याला बदली झाली. वासुदेवांना त्यावेळी ६० रुपये मासिक वेतन होते आणि त्यांच्या कामावर वरिष्ठ इंग्रज अधिकारीही खूष असत. सैनिकी विभागाशी संबंध असल्यामुळे ब्रिटिशांच्या सैन्य व्यवस्थेची बरीचशी माहिती त्यांना आपोआपच मिळाली.

१८७० मध्ये वासुदेवांना आई अत्यवस्थ असल्याचे वृत्त शिरढोणहून कळले. तिला भेटण्यासाठी त्यांनी कार्यालयातून सुट्टी मागितली; पण ती त्यांना मिळाली नाही. उलट अपशब्द ऐकावे लागले. वासुदेव तसेच आईच्या भेटीला निघून गेले; मात्र ते तिथे पोहोचण्याआधीच आई मृत्यू पावली होती. आपल्या आईची शेवटची भेट होऊ न देणारा इंग्रज अधिकारी आणि एकंदर इंग्रज यांच्याविरुद्ध त्यांचे मन फार प्रक्षुब्ध झाले. १८७१ या वर्षी पुण्यात काकांनी सार्वजनिक सभेद्वारे जनतेची गाऱ्हाणी दूर करण्यासाठी आघाडी उघडली. वासुदेवांनी त्यांच्या या कार्यात भाग घेतला. १८७३ मध्ये काकांनी खादी वापरण्याचे व्रत घेतले, तेव्हा वासुदेवांनीही फक्त स्वदेशी वस्तू वापरण्याची शपथ घेतली आणि ती आजन्म पाळली. वासुदेव बळवंत फडके सुट्टीच्या दिवशी जवळच्या खेड्यापाड्यात जाऊन स्वदेश आणि स्वातंत्र्य यांवर व्याख्याने देत फिरू लागले. गरीब जनतेची दुःखे जवळून पाहू लागले. 'इंग्रजी राज्यामुळेच तुमची ही अशी दैना आहे', असे ते शेतकऱ्यांना सांगू लागले. त्यांनी पुण्यात तरुणांसाठी तलवार आणि दांडपट्टा चालवण्याचा अन् मल्लविद्या शिकवण्याचा वर्ग काढला. तो गुप्तपणे रात्री किंवा पहाटे नरसोबाच्या देवळापलीकडे निवांत जागेत चाले. त्यात शेदीडशे तरुण येत. त्यात शरीर कमवण्यासाठी एक वर्ष अभ्यासाला रजा देणारे लो. बाळ गंगाधर टिळक हेही होते. या तरुणांतून तावून सुलाखून निघालेल्या निवडक तरुणांची त्यांनी एक गुप्त संघटना स्थापन केली. प्रभात फेऱ्यांमधून शाळा-महाविद्यालयांनी दिलेल्या भेटींतून आणि भक्तीपर कार्यक्रमांतून ते आणि त्यांचे सहकारी आपल्या कार्याचा प्रचार करीत. दसऱ्याला रस्त्यांच्या वाड्यात शस्त्रपूजनाचा मोठा समारंभ होई. त्या वेळी दहीपोह्यांचा द्रोण हातात घेऊन स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रतिज्ञा हे सभासद घेत. इंग्रजांचे हे राज्य उलथून स्वातंत्र्य मिळवल्याखेरीज देशाचे भले होणार नाही, अशी त्यांची खात्री झाली आणि त्यांच्या मनात बंडाचे विचार चालू झाले. ते आत्मवृत्तात म्हणतात, 'ज्या भूमीच्या पोटी आपण जन्मलो, तिच्याच पोटी ही सारी लेकरे झाली, त्यांनी अन्नावाचून उपाशी मरावे आणि आपण कुत्र्याप्रमाणे पोट भरीत रहावे, हे मला पहावले नाही आणि म्हणून मी ब्रिटीश सरकारविरुद्ध बंड पुकारले.'

ही वेळ राजकीय बंडाची म्हणजे दरोडे घालून राज्यसत्तेला आव्हान देण्याचीच होती. १८७९ च्या फेब्रुवारीत शिवरात्रीच्या मुहुर्तावर रामोशी, मांग इत्यादी लोक आणि काही पांढरपेशे लोक अशा दोनतीनशे लोकांच्या सेनेसह त्यांनी थामारी गावावर पहिला दरोडा घातला. त्यानंतर त्यांनी घातलेल्या एका मागून एक अशा अनेक दरोड्यांमुळे इंग्रज सरकार चक्रावून गेले. नंतर जून १८७९ मध्ये ते गाणगापुरात परतले. नजीकच राहणाऱ्या रोहिल्यांशी ५०० घोडेस्वारांची नवी सेना उभारण्याचा त्यांनी करार केला आणि पैसे आणण्यासाठी ते पंढरपुरात निघाले. तेव्हा त्यांना पकडण्यासाठी १५०० हिंदी आणि गोरे सैनिक मेजर डॅनिअलच्या हाताखाली सतत खपत होते. हेरांकडून डॅनिअलला त्यांचा सुगावा लागला. सतत ४२ तासांच्या पाठलागानंतर त्यांना देवरनावडगी येथे २० जुलैच्या मध्यरात्री निद्रिस्त असता अटक करण्यात आली. पकडल्यानंतरही डॅनिअलला द्वंद्वयुद्धाचे आव्हान त्यांनी दिले; पण त्याने ते स्वीकारले नाही. त्यांच्या बंडाच्या माहितीसाठी त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. पुण्याच्या सत्र न्यायालयात त्यांच्यासह १६ जणांवर राणी सरकार विरुद्ध सशस्त्र बंड पुकारण्याचा, कट केल्याचा, त्यासाठी माणसे आणि शस्त्रे गोळा केल्याचा, सरकारविरुद्ध राजद्रोह पसरविण्याचा आणि दरोडे घालण्याचा असे आरोप ठेवण्यात आले. त्यांच्या स्वप्नाला आणि ध्येयाला पेलेल असा प्रतिसाद न मिळाल्यामुळे या आद्यक्रांतिकारकाच्या नशिबी जन्मठेप, काळेपाणी, एडनचा कारागृह, तेथे तेलाचा घाणा चालवणे, चक्की पिसणे असे भोग आले. त्यांचे तेथे हालहाल करण्यात आले, तेव्हा दीड वर्षातच म्हणजे १२ ऑक्टोंबर १८८० या दिवशी मध्यरात्री त्यांनी आपल्या बेड्या तोडून, कोठडीची जड दारे उखडून, कारागृह फोडून पलायन केले. ते बारा मैल तसेच पळत होते.

दुसऱ्या दिवशी बरेच पोलीस आणि सोजीर त्यांच्या पाठलागावर निघाले आणि दुपारी ३ वाजता त्यांना वीर आनंद या ठिकाणी पकडून परत कारागृहात आणले. मग जडातील जड बेड्या, एकाकी कोठडी आणि छळ चालू झाला. त्यांचे भीमकाय शरीर खंगत गेले. क्षयाने ते जर्जर झाले आणि वयाच्या केवळ अडतिसाव्या वर्षी १७ फेब्रुवारी १८८३ या दिवशी सायंकाळी ४.२० वाजता त्यांनी देह ठेवला. मातृभूमीला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी क्रांतीच्या असंख्य ज्वाला पेटवून हा वीर क्रांतिकारक अंतर्धान पावला! अशा या क्रांतीपुरूषाच्या जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !

-जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

गृहस्वामीनीचा सन्मान म्हणजे सुसंस्कृत समाजाची नांदी

गृहिणीची सर्वार्थाने ढोबळ मानाने व्याख्या म्हणजे जी घर सांभाळते ती गृहिणी. त्यामध्ये सकाळी भल्या पहाटे उठून ते रात्री बारा वाजेपर्यंत काम करणारी आणि अतिशय कष्टप्रद जीवन जगणारी स्त्री व्यक्तिरेखा नजरेसमोर उभी राहते. पण प्रत्यक्षात आता गृहिणी या व्याख्येचे आयाम क्रांतिकारकरित्या बदलले आहेत. गृहिणींमध्ये प्रचंड विभाजन झाले आहे, कोणे एके काळी सर्वसाधारणपणे गृहिणी ह्या थोड्याफार फरकाने सर्वत्र सारख्याच असण्याचा तो काळ होता. आता मात्र गृहिणींची प्रतवारी ठरली आहे. अगदी गरीब समाजातील स्त्रिया या आजही पारंपरिक गृहिणींची सर्व इतिकर्तव्य पार पाडतात. हे करताना त्यांची बऱ्यापैकी तारांबळ उडते. कारण आर्थिक गणित सांभाळताना प्रचंड विचारपूर्वक नियोजन करावे लागते. यात सर्व कामगार वर्ग, शेतकरी स्त्रिया आणि विविध मोलमजुरींची कामे करणाऱ्या स्त्रिया असतात. या सर्वार्थाने सर्व विहित कर्तव्ये पार पाडत कुटुंबाचा डोलारा सांभाळतात. काय करता असे आपण यांना विचारले असता या स्त्रिया विचारलेल्या प्रश्नाचे न कचरता उत्तर देऊन मोकळ्या होतात. जे काम करतात ते काम, अन्यथा घर सांभाळते असेही त्या मोकळेपणाने सांगतात. याउलट, मध्यमवर्गीय गृहिणींच्या वागण्यात काही दृश्य स्वरूपाचे बदल पाहायला मिळतात. या स्त्रिया सर्व सुखसोयी उपभोगता-उपभोगता घराचा हिशेब सांभाळतात. या सर्वांकडे घरकामासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक यंत्रे, भ्रमणध्वनी, लॅपटॉप आणि संगणकसुद्धा असतो. या वर्गातील स्त्रिया या जीवनाचा बऱ्यापैकी आनंद उपभोगत असतात. घरीच राहून पतिदेवाने दिलेल्या पगाराच्या पैशात घर चालवतात.

पुष्कळदा त्यातलाच पैसा स्वतःच्या व्यक्तिमत्त्वास पैलू पाडण्यासाठी देखील मुक्तहस्ते खर्च करतात. मुलांकडे लक्ष देणे, स्वतःला इंग्रजी जमत नसले तरीही मुलांच्या इंग्रजी शाळांचा प्रयत्नपूर्वक अभ्यास करून घेत घर अत्यंत चांगल्या प्रकारे सांभाळतात, त्यामध्ये बराचसा वेळ हा समाज माध्यमांवर सक्रिय राहणे, स्वतःची करमणूक साधणे, जमेल तेव्हा जमेल तेवढ्या चर्चा आणि संवाद सत्रांमध्ये सहभाग नोंदविणे इत्यादी कार्ये करत गृहिणीपद उपभोगणाऱ्या या स्त्रिया असतात. यांना कुणी विचारले की, तुम्ही काय करता तर काही नाही घरीच असते असे स्वतःचे खच्चीकरण करणारे जणू काही अपराध केला आहे की काय, असे उत्तर देतात!



यानंतरचा वर्ग म्हणजे उच्च मध्यमवर्ग. या वर्गातील स्त्रियांना तसेही काहीच कमी नसते. संपन्न आणि सुखवस्तू घरातल्या या गृहिणींना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते आणि ती सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी या प्राण पणाला लावतात. पतीकडून यांच्या सर्व सुविधांची पूर्तता केली जाते, त्यांना कुठल्याही प्रकारची संघर्षाची झळ सोसावी लागत नाही. गृहिणीपदांच्या जबाबदाऱ्या यांना हाताखाली उपलब्ध असलेल्या कामकरी स्त्रिया आणि पुरुष यांच्या हस्ते कामे करवून घेऊन निभावून न्यायच्या असतात. या स्वतःचे व्यक्तिमत्त्व कसोशीने जपतात आणि संपूर्ण कुटुंबाला भक्कम आधार देत पती आणि मुले बाळे यांच्याकडे विशेष लक्ष देतात.

या सर्वसाधारणपणे होणाऱ्या वर्गीकरणात आता सर्वात महत्त्वाच्या स्त्री वर्गाचा ऊहापोह आवश्यक ठरतो, तो म्हणजे नोकरदार स्त्रिया. या स्त्रियांना गृहिणींच्या कोणत्याच इतिकर्तव्यातून सुटका नसते. शिवाय यांना सतत एक किंवा अनेक दुजाभावास सामोरे जावे लागते ते वेगळेच! यांना स्वतःची नोकरी सांभाळत-सांभाळत गृहिणींची सर्व कर्तव्य दक्षतेने सांभाळावीच लागतात. या स्त्रिया नोकरी करतात म्हणून त्यांना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही घरकामातून सुटका नसते, घर आणि नोकरी सांभाळून स्वतःकडे लक्ष देणे म्हणजे यांच्यासाठी दिव्यच असते...अशावेळी घरातल्या सर्वांनीच मिळून मिसळून कामे केली तर घराची ऊर्जा आणि घरपण टिकून राहते. काही ठिकाणी दोघेही नोकरी, किंवा उद्योग, व्यवसाय करत असतात, अशा वेळी तर घरकामात सर्वांची मदत अनिवार्य असते.


आपल्याकडे आजही बऱ्यापैकी पुरुषप्रधान संस्कृतीचा गवगवा आहे, काही ठिकाणी विपरीत परिस्थितीसुद्धा असते, जिथे स्त्रियांच्या हातातच सर्व कारभार असतो, अशा टोकाच्या भूमिका स्पष्टपणे धोक्याच्या असतात. खऱ्या अर्थाने सहजीवन ही काळाची गरज आहे. थोर विचारवंत महादेव गोविंद रानडे यांनी म्हटले होते, स्त्री-पुरुष हा अमंगळ भेदाभेद पाळून आपण समाजाची प्रचंड हानी करत असतो. श्यामची आई अर्थात साने गुरुजींच्या आईने देखील स्त्री आणि पुरुष यांच्या कामातला भेदाभाव न पाळता सहजीवनाचा पुरस्कार केला होता. ताराबाई शिंदे यांचा १८८२ साली प्रकाशित झालेला 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ म्हणजे स्त्री सन्मानाची नांदी होय. जीवशास्त्रीय फरक बाजूला ठेवून एकात्म समाज निर्मितीसाठी व समाजाच्या कल्याणासाठी केवळ स्त्री गृहिणी असून चालणार नाही तर ती 'गृहस्वामिनी' व्हायला हवी आणि त्याचवेळी पुरुषाने देखील पुरुषोत्तम बनत 'गृहस्वामी' ही भूमिका साकारायला हवी!

गृहिणी नव्हे या गृहस्वामिनीने कुटुंब आणि नातेसंबंध जपताना स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. कारण एक स्त्री शिकली तर संपूर्ण घर शिकते हे सांगणाऱ्या सावित्रीमाईंच्या विचाराबरोबरच, निरोगी स्त्री- निरोगी कुटुंब: हे सुद्धा अंतिम सत्य आहे! म्हणूनच सर्व पातळीवर गृहिणी म्हणून नव्हे तर गृहस्वामिनी म्हणून स्त्रीचा सन्मान व्हावा, तो तिनेही जपावा आणि कुटुंबाचा गाडा हाकावा!

अगदी बरोबर आहे की, मनुष्य एकटाच जन्माला येतो आणि एकटाच जातो, पण स्वतःच्या अस्तित्वाचा मृदगंध मागे दरवळला पाहिजे याकडे लक्ष द्यावे हे गृहस्वामिनीचे आद्य कर्तव्य ठरते. स्त्रीला गृहस्वामिनी आणि मुख्य म्हणजे स्त्री म्हणून सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे, जी आज देखील मिळताना दिसत नाही हे अंतिम सत्य आहे. ती गृहस्वामिनी असो की, कार्यालय राणिणी असो तिचा आत्मसन्मान म्हणजे सुसंस्कृत समाजाची नांदी होय हे निश्चित!

– डॉ. संगीता जी. आवचार,
उपप्राचार्य व इंग्रजी विभाग प्रमुख,
कै. सौ. कमलताई जामकर
महिला महाविद्यालय,
जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी
साहित्य मंडळ, परभणी

शेतीच्या आर्थिक स्थैर्यासाठी धोरणात्मक बदलांची गरज



भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे योगदान महत्त्वपूर्ण असून, कोट्यवधी लोकांचे जीवन शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. ऊन, वारा, पाऊस आणि नैसर्गिक संकटांशी सामना करत तो शेतात राबतो आणि संपूर्ण देशासाठी अन्नधान्य पिकवतो. मात्र, दुर्दैवाची बाब म्हणजे देशाचा पोशिंदा असलेला शेतकरी आजही आर्थिक विवंचनेतून बाहेर पडलेला नाही. शेतीत कष्ट करूनही त्याच्या हातात अपेक्षित उत्पन्न पडत नाही. उत्पादन खर्च वाढत आहे, शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही आणि कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आत्मनिर्भर होणार की कायम कर्जबाजारीच राहणार, हा प्रश्न गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे शेती हा व्यवसाय निसर्गावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

कधी अतिवृष्टी, कधी अवर्षण, तर कधी अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. बदलत्या हवामाना-चा सर्वाधिक फटका शेती क्षेत्राला बसत आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत शेतकऱ्याला अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, वीज आणि इंधन यांच्या किमती वाढत असताना शेतीमालाला मात्र अपेक्षित बाजारभाव मिळत नाही. त्यामुळे उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेळ बसवणे शेतकऱ्यांसाठी दिवसेंदिवस कठीण होत आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटामागील सर्वांत मोठे कारण म्हणजे शेतीमालाच्या बाजारभावातील अनिश्चितता. शेतकरी मोठ्या मेहनतीने उत्पादन घेतो; मात्र बाजारात माल विक्रीसाठी आणल्यानंतर त्याला योग्य भाव मिळेलच याची खात्री नसते. अनेकदा उत्पादन खर्चापेक्षाही कमी दराने शेतीमाल विकण्याची वेळ येते. बाजारातील मध्यस्थांची साखळी, साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा, प्रक्रिया उद्योगांचा अभाव आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडते. ग्राहकांना मात्र त्याच शेतीमालासाठी अधिक पैसे मोजावे लागतात. उत्पादक आणि ग्राहक यांच्यातील या मोठ्या आर्थिक दरीचा फायदा मध्यस्थांना होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

शेतीसाठी भांडवल उभे करण्याच्या उद्देशाने शेतकरी बँका, सहकारी संस्था आणि खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. मात्र, नैसर्गिक संकटामुळे पीक हातचे गेले किंवा बाजारभाव कोसळले तर कर्जाची परतफेड करणे अशक्य होते. एका हंगामातील नुकसान भरून काढण्यासाठी पुढील हंगामात पुन्हा कर्ज घ्यावे लागते. अशा प्रकारे कर्जाचे चक्र सुरूच राहते. कर्जमाफी हा काही प्रमाणात तात्पुरता दिलासा असू शकतो; परंतु शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्येवर तो कायमस्वरूपी उपाय नाही. शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफीची वाट पाहावी लागू नये, अशी सक्षम आणि शाश्वत शेती व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी शेतीचे आधुनिक तंत्रज्ञानाशी नाते जोडणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन, मृदासंधारण, जलसंधारण, सुधारित बियाणे, माती परीक्षण आणि आधुनिक यांत्रिकीकरण यांचा योग्य वापर केल्यास उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढवता येऊ शकते. त्याचबरोबर पिकांचे नियोजन करताना बाजारपेठेतील मागणी, हवामानाचा अंदाज आणि उपलब्ध पाण्याचा विचार करणे गरजेचे आहे.

शेतीसाठी स्वतंत्र आणि प्रभावी बाजारपेठ धोरण राबविल्याशिवाय शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य निर्माण होणार नाही. आज शेतकऱ्यांसमोर केवळ उत्पादन वाढविण्याचे आव्हान नाही, तर उत्पादित मालाला योग्य किंमत मिळविण्याचेही मोठे आव्हान आहे. शेतीत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शेती फायदेशीर झाली तरच तरुण पिढी शेतीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहील. अन्यथा ग्रामीण भागातील तरुण शेती-पासून दूर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेती टिकली तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली तरच देशाच्या विकासाला खरी गती मिळेल. शेतकऱ्यांना कर्जमाफीपेक्षा कर्जमुक्तीचा मार्ग दाखविणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी शेतीला शाश्वत उत्पन्नाचा व्यवसाय बनविण्याची गरज आहे केवळ आश्वासने, घोषणा आणि तात्पुरत्या मदतीने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. शेतीमालाला योग्य भाव, सिंचनाची शाश्वत व्यवस्था, कमी उत्पादन खर्च, आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग आणि सक्षम बाजारपेठ या बाबींवर ठोस काम झाले पाहिजशेवटी, शेतकरी आत्मनिर्भर झाला तरच देश खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होईल. शेतकऱ्याच्या हातात आर्थिक स्थैर्य आले, त्याच्या कुटुंबाला सुरक्षित भविष्य मिळाले आणि शेती फायदेशीर व्यवसाय बनली तरच ग्रामीण विकासाचे स्वप्न साकार होईल. शेतकऱ्याला कायम मदतीची अपेक्षा ठेवणारा नव्हे, तर स्वतःच्या कष्टातून आर्थिक प्रगती साधणारा बनविणे ही शासन, समाज आणि कृषी व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे. शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर कमी करून त्याच्या हातात समृद्धीची पताका देण्याची वेळ आली आहे. शेतकरी कर्जबाजारी राहणार की, आत्मनिर्भर होणार, याचे उत्तर केवळ शेतकऱ्याच्या कष्टात नाही, तर शेतीविषयक धोरणे आणि व्यवस्थेतील बदलांमध्ये दडलेले आहे!

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'समुपदेशन केंद्र' आधारवड ठरेल -कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

स्वारातीम विद्यापीठात समुपदेशन केंद्राचे उद्घाटन; विद्यार्थ्यांना दररोज मिळणार समुपदेशन सेवा

नांदेड (प्रतिनिधी)– बदलत्या सामाजिक व शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधण्यासोबतच त्यांचे मानसिक स्वास्थ्य जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, वैयक्तिक आणि करिअरविषयक समस्यांचे निराकरण करून त्यांना योग्य दिशा देण्यासाठी विद्यापीठात नव्याने सुरू करण्यात आलेले समुपदेशन केंद्र निश्चितच आधारवड ठरेल, असा विश्वास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या औषधनिर्माणशास्त्र संकुलातील (स्कूल ऑफ फार्मसी) नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'समुपदेशन केंद्रा'चे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.



यावेळी कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील समुपदेशनाचे महत्त्व विशद केले. समुपदेशन प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची भूमिका काय असावी, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. बदलती जीवनशैली आणि वाढती स्पर्धा लक्षात घेता विद्यार्थ्यांनी अशा सुविधांचा सकारात्मक लाभ घेऊन आपला सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी केंद्राचे समन्वयक डॉ. सुरेंद्र गट्टानी यांनी प्रास्ताविकातून समुपदेशन केंद्राची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि भविष्यातील नियोजनाची माहिती दिली. त्यानंतर डॉ. स्मिता नायर यांनी पीपीटी सादरीकरणाद्वारे केंद्रामार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम तसेच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या समुपदेशन सुविधांची सविस्तर माहिती दिली.

या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी, वैयक्तिक समस्या, मानसिक ताणतणाव आणि करिअरविषयक संभ्रम यांबाबत योग्य मार्गदर्शन व समुपदेशन उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, उद्घाटनाच्या दिवसापासूनच हे केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून, दररोज दुपारी २ ते ४ या वेळेत विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सेवा उपलब्ध राहणार आहे.

उद्घाटनप्रसंगी कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, केंद्राचे समन्वयक डॉ. सुरेंद्र गट्टानी, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. संजय पेकमवार, सामाजिकशास्त्र संकुलाचे डॉ. बाबुराव जाधव, डॉ. नंदकुमार बोधगिरे, डॉ. टी. ए. कदम यांच्यासह विविध संकुलांतील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन गायकवाड यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सामाजिकशास्त्र संकुलाचे डॉ. बाबुराव जाधव यांनी मानले. समुपदेशन केंद्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. झिनत शेख, प्रा. ओंकार मठपती, मानसशास्त्र विभागाचे प्रा. अतुल समिंद्रे, डॉ. शिवाजी गायकवाड, डॉ. तातेराव पवळे यांच्यासह संयोजन समितीने विशेष परिश्रम घेतले.

नांदेडमध्ये उत्साहात रंगला 'वंदे मातरम् महोत्सव २०२६'

६०० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग; महाराष्ट्रभरातून ४० समूहांची समूह नृत्य स्पर्धेत उपस्थिती

नांदेड (प्रतिनिधी)– 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने आणि सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या वतीने आयोजित 'वंदे मातरम् महोत्सव २०२६' रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. देशभक्ती, भारतीय संस्कृती, कला आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा सुंदर संगम या महोत्सवातून नांदेडकरांना अनुभवायला मिळाला.

महोत्सवाच्या विविध स्पर्धांना नांदेडसह महाराष्ट्रभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. निबंध, वक्तृत्व, चित्रकला, रील, समूहगायन आणि समूह नृत्य अशा विविध स्पर्धांमध्ये एकूण सुमारे ६०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे आंतरशालेय स्पर्धांमध्ये तीनशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर महोत्सवाच्या प्रमुख आकर्षण ठरलेल्या समूह नृत्य स्पर्धेत महाराष्ट्राच्या विविध भागांतून सुमारे ४० समूह सहभागी झाले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, तर विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, नांदेडच्या महापौर सौ. कविता मुळे, विशेष कार्यकारी अधिकारी एकनाथ शिंदे तसेच प्रदीप जेठवाणी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. बक्षीस वितरण व समारोप सोहळ्यास नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर तसेच नांदेड दक्षिणचे आमदार आनंद तिडके-बोंढारकर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, नांदेड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. सिद्धीचा सोनी, अखिल भारतीय ब्राह्मण महासभेचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

निबंध स्पर्धेच्या इयत्ता आठवी ते दहावी गटात शिवाजी विद्यालय सिडको यांनी प्रथम, महात्मा फुले हायस्कूल बाबानगर यांनी द्वितीय, तर ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल यांनी तृतीय क्रमांक मिळविला. गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, आंध्र समिती तेलुगू हायस्कूल आणि पीएम श्री केंद्रीय विद्यालय यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

इयत्ता पाचवी ते सातवी गटात जिल्हा परिषद शाळा, पिंपळगाव यांनी प्रथम, महात्मा फुले हायस्कूल, नाईक नगर यांनी द्वितीय, तर शिवाजी विद्यालय, सिडको आणि गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, नांदेड यांनी तृतीय क्रमांक मिळविला. गुजराती हायस्कूल, नेहरू इंग्लिश स्कूल आणि महात्मा फुले हायस्कूल यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

चित्रकला स्पर्धेच्या इयत्ता आठवी ते दहावी गटात बाल विद्या मंदिर हायस्कूल, परभणी यांनी प्रथम, महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर यांनी द्वितीय आणि ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल यांनी तृतीय क्रमांक मिळविला. महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर आणि आंध्र समिती तेलुगू हायस्कूल यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

दरेगाव येथे आज जलदीपाची दीपावली

नांदेड (प्रतिनिधी)– गावातील पाणी गावात, शेतातील पाणी शेतात हा संदेश घेऊन दरेगाव (ता. नायगाव खै., जि. नांदेड) येथे जलदीपाची दीपावली हा जलसंवर्धनाचा उपक्रम सुरू होत आहे. त्याचा प्रारंभ सोहळा बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हनुमान मंदिर प्रांगणात होणार आहे. त्याआधी सकाळी १० वाजता गावातून जलदिंडी काढण्यात येणार आहे. दि. ४ व ५ नोव्हेंबर असे दोन दिवस जलसंस्कृती साक्षरता शिबीर व श्रमदान होणार आहे.

सोहळ्याचे उद्घाटन नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते होणार आहे. नांदेड वनविभागाच्या उपवनसंरक्षक श्रीमती मनीषा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शिवा संघटनेच्यावतीने देण्यात येणारे महत्त्वपूर्ण शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार २०२६ जाहीर; अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांची माहिती

लोहा (प्रतिनिधी)– शिवा संघटनेच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.



यावेळी शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी सांगितले की, २०२६ च्या शिवा पुरस्कारासाठी निवड झालेल्या मान्यवरांची अधिकृत यादी शिवा संघटनेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात येत असून, पुरस्कारार्थींची नावे व सविस्तर माहिती यादी पुढीलप्रमाणे आहे. शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट गायक वादक पुरस्कार -श्री म.नि. प्र.१०८ गुरू संगनबसव शिवाचार्य निलंगेकर (निलंगा), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार -शिवाजी (शिवा) खंडोजी कांबळे (नांदेड), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट शिव कीर्तनकार पुरस्कार - शि.भ.प. गोरोबा काका नरसिंग शिवणे (लातूर), शि.भ.प. उमाकांत जगन्नाथ मिटकरी (लातूर), शि.भ.प. कु. पूजा रमेश सातारकर (मध्यप्रदेश), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट शिवा शाखा पुरस्कार शिवा शहर शाखा पुणे द्वारा वैजेनाथ अपशेट्टी, रोहिदास बेलुरे, प्रदीप हत्ते, शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट शिवा गाव शाखा पुरस्कार - शिवा संघटना गाव शाखा अतनूर ता. जळकोट जि. लातूर द्वारा - रवि कल्पे, अरविंद सासट्टे, शिवा संघटना गाव शाखा हंगरगा (नळ) ता. तुळजापूर जि. धाराशिव द्वारा - सिध्देश्वर वाघोले (शाखा प्रमुख), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट शिवा सोशल मीडिया कार्यकर्ता पुरस्कार -सदाशिव रामदासअप्पा साखरे (आळंदी), शिवानंद बळीराम गगणे (लोहा), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार -कंठयप्पा काशिनाथ अप्पा मठवाले (तेलंगणा), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार - आशिष शरदराव चेडगे दै. युवा राष्ट्र दर्शन (भंडारा), प्रभाकर (बंडू)पटणे (छत्रपती संभाजीनगर) शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार -प्रा.डॉ. गंगाधर तोगरे दै. नवराष्ट्र (कंधार), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट धर्म प्रचारक पुरस्कार - शि.भ.प. हावगी अप्पा नरसिंगअप्पा देवणे (लोहा -खेडकरवाडी), शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट सेवाधारी संस्था पुरस्कार -एक्स. वाय .झेड . ॲडस नारळीबाग छत्रपती संभाजीनगर द्वारा अशोक भगवान जाधव, शिवा राष्ट्रीय भूषण उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार -अनुप भगवानराव पेटकर (बहादरपुरा -कंधार) यांना जाहीर करण्यात आले आहेत.

दुष्काळाच्या झळा गोशाळांनाही; पशुधनासाठी दररोज १०० रुपये अनुदान द्या!

महाराष्ट्र गोशाळा महासंघाची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी; राज्यातील १ हजार १४ गोशाळांना दिलासा देण्याचे आवाहन

नायगाव (प्रतिनिधी)– राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजुरांपाठोपाठ आता गोशाळांमधील पशुधनाचाही चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. चाऱ्याची टंचाई, वाढते दर आणि पाण्याची कमतरता यामुळे गोशाळा चालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील नोंदणीकृत १ हजार १४ गोशाळांमधील पशुधनासाठी प्रति पशू प्रतिदिन १०० रुपये चारा व पाणी अनुदान द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र गोशाळा महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पावसाअभावी शेतशिवारात हिरवा चारा, कडबा आणि कुटार उपलब्ध होत नसून, पडित जमीन, डोंगर व जंगलातील चाऱ्याचे स्रोतही कमी झाले आहेत. त्यातच चाऱ्याच्या किमती वाढल्याने गोशाळांचा दैनंदिन खर्च वाढला आहे. विहिरी, बोअरवेल, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा घटल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही कठीण होत आहे.



दुष्काळामुळे अनेक शेतकरी आपले पशुधन गोशाळांमध्ये आणून देत असल्याने जनावरांची संख्या क्षमतेपेक्षा वाढत आहे. दुसरीकडे आर्थिक अडचणींमुळे काही पशुपालक जनावरे विकण्यास मजबूर होत असून, गोवंशाच्या अवैध वाहतूक व कत्तलीचा धोका वाढण्याची शक्यता महासंघाने व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने प्रति पशू प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने मंजूर करून त्याचे वितरण सुरू करावे. तसेच प्रत्येक गावात ग्रामपंचायत स्तरावर चारा डेपो उभारून पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

गोशाळा या दुष्काळाच्या काळात पशुधनाच्या संरक्षणाची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडत आहेत. त्यामुळे गोशाळा चालकांच्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि अनुदानाबाबत आदेश निर्गमित करावेत, असे मागणी महाराष्ट्र गोशाळा महासंघाने केले आहे.

विश्व हिंदू परिषद मंदिर आयामतर्फे मंदिर स्वच्छता अभियानाला प्रतिसाद



नांदेड (प्रतिनिधी)– हिंदूंचा सर्वात मोठा सण असणारी दीपावली म्हणजे प्रकाश, मांगल्य आणि आनंदाचे पर्व. या उत्सवानिमित्त आपली मंदिरे स्वच्छ व भक्तीमय असावीत तसेच सामाजिक समरसता, सेवेभाव आणि सामूहिक आनंदाची केंद्रे व्हावीत, या भावनेतून विश्व हिंदू परिषद, मंदिर आयाम विपणातर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. रविवार, दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते ११ या दरम्यान नांदेड शहरात मंदिर स्वच्छता अभियान अतिशय उत्साहात, श्रद्धेने, व भक्तीमय वातावरणात झाले .एकाच दिवसात प्रत्येक वस्तीतील मंदिरे तेथील कार्यकर्त्यांनी जबाबदारीने स्वच्छता करावी, मंदिरावर भगवा ध्वज लावावा हे कार्य या अभियानात होते.

या उपक्रमात युवक, महिला व परिसरातील सर्व नागरिकांनी,तसेच अनेक हिंदुत्ववादीव सामाजिक संघटनांनी या अभियानात सहभाग घेतला. या अभियानात नांदेड शहरातील एकूण ११५ मंदिरे एकाच दिवसात स्वछता करण्यात आलेली आहे, अशी माहिती विश्व हिंदू परिषद जिल्हा सहमंत्री गणेश कोकुलवार व मंदिर आयाम जिल्हाप्रमुख अमोल कंडारकर यांनी केले आहे.

पान १ वरून...

किनवटच्या महाघोटाळ्याची रक्कम...

जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकांकडून याप्रकरणाची कसून चौकशी सुरू आहे. तपासादरम्यान सन २०२३ या आर्थिक वर्षातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यातील १८ नोंदींमधून १ कोटी ८ लाख ४० हजार २ रुपयांचा संशयास्पद व्यवहार समोर आला होता. आता किनवट येथील ॲक्सिस बँकेच्या शाखेतील केंद्रीय सहाय्य योजना, आदिम जमाती योजना आणि कलम २७५/१ या तीन योजनांच्या खात्यांमधून आणखी सुमारे २ कोटी १३ लाख रुपये उचलल्याचे तपासात निष्पन्न झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. विशेष म्हणजे या तीन योजनांच्या खात्यांतून ४२ लाभार्थ्यांच्या नावावर एकूण ४५ नोंदी करण्यात आल्याचे समोर आले आहे. यातील २८ लाख ६२ हजार रुपये संतोष मारपवार याच्या खात्यावर, तर ९० हजार रुपये भगवान डवरे याच्या खात्यावर जमा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे निधीच्या गैरव्यवहाराचे धागेदोरे आणखी खोलवर असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घोटाळ्याची रक्कम २० कोटींच्या घरात पोहोचल्याने सबंध आदिवासी विकास विभागात खळबळ उडाली आहे. तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे नवनवीन आर्थिक व्यवहार समोर येत असून, आणखी मोठ्या रकमेचा अपहार उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या प्रकरणातील पुढील तपासाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीस नगरसेविका सुवर्णा बसवदे यांची मदत; माजी मुख्यमंत्री खा. चव्हाण यांच्याकडे धनादेश सुपूर्द

नवीन नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या भाजपाच्या प्रभाग क्रमांक २० मधील नगरसेविका सौ सुर्वणाताई सतिश बसवदे यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थिती पाहता मुख्यमंत्री सहायता निधीस माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या कडे ५१ हजारांच्या निधीचा धनादेश सुपूर्द केला.

सिडको भागातील भाजपाच्या नगरसेविका प्रतिनिधी सतीश बसवदे हे दरवर्षी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सिडको परिसरात सामाजिक बांधिलकी जोपासत युवा गुप्र मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून नवरत्न पुरस्कार,



महिला मंडळाच्या माध्यमातून होम मिनिस्टर कार्यक्रम, हभप इंदुरीकर महाराज यांच्या कीर्तन, प्रवचन कार्यक्रमासह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

यावेळी महाराष्ट्र राज्यात पावसा अभावी कोरडा दुष्काळ पडल्याने २८ ऑक्टोबर रोजी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने होणारे कार्यक्रम रद्द करून भाजपा नगरसेविका सौ. सुर्वणाताई सजरश बसवदे यांनी मुख्यमंत्री निधीस ५१ हजारांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी नांदेड शहर भाजपा महानगर अध्यक्ष आमदार अमर राजूरकर, माजी नगरसेवक संजय इंगेवाड यांची उपस्थिती होती.

नरसिंह विद्यामंदिरात आकाश कंदील व हाताने बनवलेल्या पणत्यांचा उपक्रम व त्याचे प्रदर्शन संपन्न



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– नरसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळा सिडको येथे वर्ग पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी शालेय हस्तकला उपक्रम अंतर्गत हाताने बनवलेले व सजवलेले आकाश कंदील व मातीपासून स्वतः बनवलेले दिवे व पणत्या यांचे शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली अतिशय सुंदर असे प्रदर्शन ३१ ऑक्टोबर रोजी शाळेच्या प्रांगणात भरवले.

दिवाळी सणानिमित्त बनवण्यात येणारे आकाश कंदील विद्यार्थ्यांनी घरून बनवून आणले होते. अतिशय सुंदर व आकर्षक सजावट केलेले दिवे, पणत्या सुंदर दिसत होत्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणाला वाव देणाऱ्या या उपक्रमासाठी पालकांनी व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वंदना एकुंडवार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद क्षीरसागर यांनी केले तर आभार जी. टी .बसवदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

'झेनिथ मॅरेथॉन २०२६' उत्साहात संपन्न; नांदेडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जलसंवर्धनाचा संदेश देत ७५० हून अधिक नागरिक धावले; ५० हजार रुपयांच्या बक्षिसांचे वितरण

नांदेड (प्रतिनिधी)– येथील श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी येथील वार्षिक क्रीडा महोत्सवांतर्गत 'टीम झेनिथ'च्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'झेनिथ मॅरेथॉन २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाली. 'थेंब थेंब महत्त्वाचा, पाणी वाचवा, भविष्य सुरक्षित करा' हा जलसंवर्धनाचा सामाजिक संदेश देत लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत ७५० हून अधिक नागरिक, विद्यार्थी आणि क्रीडाप्रेमींनी या ५ किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला.

मॅरेथॉनचा प्रारंभ सकाळी ६ वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय



येथून झाला. संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली. पोलीस अधीक्षक कार्यालय येथून सुरू झालेली ही धाव शिवाजीनगर, आयटीआय कॉर्नर, वर्कशॉप कॉर्नर, भाग्यनगर आणि आनंदनगर मार्गे नागार्जुना हॉटेल येथे संपन्न झाली.

पारितोषिक वितरण समारंभात बोलताना संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे म्हणाले, नांदेडकरांनी या सामाजिक उपक्रमाला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणारा आहे. या मॅरेथॉनच्या आयोजनामागे प्रामुख्याने दोन उद्देश होते. पहिला म्हणजे नागरिकांमध्ये आरोग्य आणि व्यायामाविषयी जागरूकता निर्माण करणे. शरीर निरोगी असेल तरच विचार सकारात्मक आणि प्रगतीशील होतात. दुसरा महत्त्वाचा उद्देश म्हणजे महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जाणवणारी पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थिती. या पार्श्वभूमीवर 'थेंब थेंब महत्त्वाचा, पाणी वाचवा, भविष्य सुरक्षित करा' हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले. केवळ तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणे हेच विद्यार्थ्यांचे ध्येय नसून, समाजातील ज्वलंत प्रश्नांविषयी संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या मॅरेथॉनमधून निर्माण झालेली जागरूकता भविष्यात जलसंवर्धनाच्या मोठ्या चळवळीला प्रेरणा देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

प्रभाग क्रमांक २० मध्ये गतिरोधक बसविण्याचे काम वेगात



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– सिडको - हडको परिसरातील नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन प्रभाग क्रमांक २० अंतर्गत तसेच मुख्य रस्त्यांवर आणि शाळा परिसरात अपघातांचा धोका टाळण्यासाठी प्रभागातील नगरसेवकांच्या वतीने प्रत्यक्ष पहाणी करून मुख्य रस्त्यावर गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. सदरील कामे लोकप्रतिनिधीनी प्रास्तावित केली होती.

यावेळी नगर सेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश पाटील बसवदे, राजू लांडगे यांच्या वतीने हडको मुख्य रस्त्याची पहाणी करून वाहनांचा वाढता वेग आणि शाळकरी विद्यार्थ्यांसह पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा उपक्रम राबविला असून, विशेषतः शाळा परिसरात होणारे संभाव्य अपघात रोखण्यासाठी गतिरोधक बसविण्याबाबत मनपा आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

निरामय

साध्या सर्दी-पडशातून होऊ शकतो सायनसचा त्रास!

हवामानात बदल झाला की अनेकांना सर्दी, पडसे, डोकेदुखी आणि तापाचा त्रास जाणवू लागतो. काही जणांना अनेक दिवस नाक वाहणे किंवा नाक बंद होण्याची समस्या सतावत असते. अशावेळी हा साधा सर्दी-पडशाचा त्रास असल्याचे समजून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, प्रत्येक वेळी ही सामान्य सर्दी असेलच असे नाही. काही प्रकरणांमध्ये ही लक्षणे सायनसचा संकेतही असू शकतात. तज्ज्ञांच्या मते, सर्दी आणि सायनसची लक्षणे बऱ्याच प्रमाणात सारखी असल्याने दोन्हींमधील फरक ओळखणे कठीण जाते. विशेष म्हणजे, सर्दी निर्माण करणाऱ्या विषाणूंमुळेही सायनसमध्ये सूज येऊ शकते. त्यामुळे केवळ नाक वाहणे किंवा कफाच्या रंगावरून सर्दी आणि सायनस यांतील फरक ठरवता येत नाही. सायनसमध्ये सूज आणि द्रव साचल्यामुळे नाक बंद होणे, चेहऱ्यावर वेदना किंवा दाब जाणवणे तसेच घशात कफ उतरणे अशी लक्षणे दिसू शकतात.



सर्दी आणि सायनसची सुरुवात सारखी का वाटते?

सामान्य सर्दी हा प्रामुख्याने विषाणूंमुळे होणारा वरच्या श्वसनमार्गाचा संसर्ग आहे. यामध्ये नाक वाहणे, शिंका येणे, घशात खवखव होणे, खोकला आणि नाक बंद होणे अशी लक्षणे दिसतात. दुसरीकडे, सायनुसायटिस (Sinusitis) म्हणजे नाकाच्या आसपास असलेल्या हवेने भरलेल्या पोकळ्यांच्या आतील आवरणाला सूज येणे. या पोकळ्यांना सायनस म्हणतात. सूज आल्यामुळे कफ बाहेर पडण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. परिणामी, चेहऱ्यावर दाब जाणवणे, कपाळ किंवा गालांमध्ये वेदना होणे अशा समस्या उद्भवू शकतात. दोन्ही आजारांची लक्षणे सारखी वाटण्याचे कारण म्हणजे सर्दी निर्माण करणारे विषाणूही सायनसच्या आतील आवरणाला सूज आणू शकतात. याचा अर्थ प्रत्येक सायनसचा संसर्ग हा जिवाणूंमुळेच होतो असे नाही. अनेकदा विषाणूजन्य संसर्गामुळे सुरू झालेली सायनसची लक्षणे कालांतराने आपोआप कमी होतात. सामान्य सर्दी हे तीव्र सायनुसायटिसचे (Acute Sinusitis) एक प्रमुख कारण आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये सुमारे एक आठवडा ते दहा दिवसांत लक्षणे कमी होऊ लागतात. मात्र, प्रत्येक व्यक्तीला बरे होण्यासाठी लागणारा कालावधी वेगवेगळा असू शकतो.

नाक वाहणे सामान्य सर्दीचे लक्षण की सायनसचा संकेत?

सर्दीच्या सुरुवातीच्या काळात नाक वाहणे किंवा बंद होणे ही सामान्य लक्षणे असतात. संसर्ग झाल्यानंतर सुरुवातीचे दोन ते तीन दिवस ही लक्षणे अधिक तीव्र जाणवू शकतात. यासोबत शिंका येणे, घशात खवखव, खोकला आणि अंगदुखीचाही त्रास होऊ शकतो. बहुतांश वेळा आठवडाभरात सर्दी कमी होऊ लागते. मात्र, खोकल्यासारखी काही लक्षणे अधिक काळ टिकू शकतात. नाक बंद होणे किंवा कफ वाहण्यासोबतच चेहऱ्यावर दाब जाणवणे, कपाळ आणि गालांमध्ये वेदना होणे तसेच घशाच्या मागील बाजूस कफ उतरणे अशी लक्षणे दिसल्यास सायनुसायटिसची शक्यता वाढते. वास घेण्याची क्षमता कमी होणे हेदेखील त्याचे एक लक्षण असू शकते. लक्षणे किती दिवसांपासून आहेत, हेही महत्त्वाचे आहे. नाक आणि सायनसशी संबंधित त्रास दहा दिवस किंवा त्याहून अधिक काळ कोणतीही सुधारणा न होता कायम राहिल्यास जिवाणूजन्य सायनस संसर्गाची शक्यता तपासली जाऊ शकते. सुरुवातीला लक्षणे कमी झाली आणि त्यानंतर पुन्हा तीव्र झाली, तरी वैद्यकीय तपासणी आवश्यक ठरू शकते. मात्र, केवळ लक्षणांच्या कालावधीवरून स्वतःच निदान करणे योग्य नाही.

पिवळा किंवा हिरवा कफ म्हणजे जिवाणूंचा संसर्ग असतो का?

नाकातून बाहेर पडणारा कफ पिवळा किंवा हिरव्या रंगाचा दिसू लागल्यास अनेक जणांना जिवाणूंचा संसर्ग झाल्याची शंका येते. अशावेळी प्रतिजैविके (अँटिबायोटिक्स) घेण्याची गरज असल्याचेही मानले जाते. मात्र, हा समज पूर्णपणे योग्य नाही. विषाणूजन्य सर्दीमध्येही कफाचा रंग पारदर्शक स्वरूपातून पिवळा किंवा हिरवा होऊ शकतो. संसर्गादरम्यान शरीराची रोगप्रतिकारशक्ती कार्यरत झाल्यामुळे कफाचा रंग आणि घट्टपणा बदलू शकतो. त्यामुळे केवळ पिवळ्या किंवा हिरव्या कफावरून जिवाणूजन्य सायनस संसर्गाचे निदान करता येत नाही. डॉक्टर लक्षणांचा कालावधी, त्यांची तीव्रता, ताप आणि चेहऱ्यावरील वेदना यांचाही विचार करतात.

जिवाणूजन्य सायनस संसर्गाची शक्यता कधी वाढते?

- दहा दिवसांपेक्षा अधिक त्रास : नाक वाहणे, नाक बंद होणे किंवा चेहऱ्यावर दाब जाणवणे अशी लक्षणे दहा दिवसांनंतरही कमी होत नसतील.
- बरे वाटल्यानंतर पुन्हा त्रास : सुरुवातीला सर्दी कमी झाल्यानंतर पुन्हा नाकातून स्राव येणे, डोकेदुखी किंवा ताप वाढणे.
- तीव्र लक्षणे : सुरुवातीपासूनच जास्त ताप, नाकातून घट्ट स्राव आणि चेहऱ्यावर तीव्र वेदना सलग अनेक दिवस जाणवणे.



सर्दी आणि सायनसकडे दुर्लक्ष करू नका!


सर्दी आणि सायनसची लक्षणे एकसारखी असू शकतात. कारण विषाणूजन्य सर्दीदरम्यानही सायनसमध्ये सूज येऊ शकते. सामान्य सर्दीमध्ये शिंका येणे, घशात खवखव आणि नाक वाहणे ही लक्षणे प्रामुख्याने दिसतात. तर सायनसच्या त्रासामध्ये चेहऱ्यावर दाब जाणवणे, नाक सतत बंद राहणे आणि घशाच्या मागील बाजूस कफ उतरणे अशा समस्या जाणवू शकतात. पिवळा किंवा हिरवा कफ म्हणजे जिवाणूंचा संसर्ग झाल्याचा निश्चित पुरावा नाही. मात्र, लक्षणे दहा दिवसांपेक्षा जास्त काळ कायम राहिल्यास, तीव्र झाल्यास किंवा सुरुवातीला बरे वाटल्यानंतर पुन्हा त्रास वाढल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास संभाव्य गुंतागुंत टाळण्यास मदत होऊ शकते.

बदाम खाल्ल्याने डोळ्यांची दृष्टी सुधारते का? चष्म्याचा नंबर कमी होतो? जाणून घ्या सत्य!

व्हिटॅमिन ईपासून अँटिऑक्सिडंट्सपर्यंत अनेक पोषक घटकांचा समावेश; मात्र डोळ्यांच्या आरोग्यासाठी बदाम किती उपयुक्त? तज्ज्ञांकडून महत्त्वाचे स्पष्टीकरण

बदाम हा मेंदूची कार्यक्षमता आणि स्मरणशक्ती सुधारण्यासाठी उपयुक्त असल्याचे मानले जाते. मात्र, बदामाचे फायदे केवळ मेंदूपुरते मर्यादित नाहीत. त्यातील पोषक घटक डोळ्यांच्या आरोग्यासाठीही महत्त्वाचे ठरू शकतात. बदामामध्ये व्हिटॅमिन ई, प्रथिने, तंतुमय पदार्थ, मॅग्नेशियम आणि आरोग्यदायी स्निग्ध पदार्थ असतात. विशेषतः व्हिटॅमिन ई हे प्रभावी अँटिऑक्सिडंट असल्याने शरीरातील पेशींचे ऑक्सिडेटिव्ह नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करते. सुमारे २८ ग्रॅम म्हणजेच एक औंस बदामातून ६.८ ते ७.३ मिलिग्रॅम व्हिटॅमिन ई मिळते. हे प्रमाण प्रौढ व्यक्तींच्या दैनंदिन गरजेच्या जवळपास निम्मे आहे. मात्र, डोळ्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक असणारे सर्व पोषक घटक बदामातून पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. उदाहरणार्थ, डोळ्यांच्या पडद्याच्या (रेटिना) आरोग्यासाठी उपयुक्त असलेले ल्युटीन आणि झियाझँथिन मिळवण्यासाठी आहारात हिरव्या पालेभाज्यांचाही समावेश करणे आवश्यक आहे.

व्हिटॅमिन ई आणि अँटिऑक्सिडंट्स डोळ्यांचे संरक्षण कसे करतात?



डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी केवळ स्पष्ट दिसणे पुरेसे नसते, तर डोळ्यांच्या विविध भागांतील पेशी निरोगी राहणेही तितकेच महत्त्वाचे असते. शरीरात मुक्त कण (फ्री रॅडिकल्स) आणि त्यांच्यापासून संरक्षण करणाऱ्या अँटिऑक्सिडंट्स यांच्यातील संतुलन बिघडल्यास ऑक्सिडेटिव्ह ताण निर्माण होतो. दीर्घकाळ हा ताण कायम राहिल्यास वयोमानानुसार उद्भवणाऱ्या काही नेत्रविकारांचा धोका वाढू शकतो. व्हिटॅमिन ई हे अँटिऑक्सिडंट असून पेशींच्या आवरणाचे ऑक्सिडेटिव्ह नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करते. त्यामुळे बदामातून मिळणारे व्हिटॅमिन ई डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते. मात्र, एखादे पोषकद्रव्य शरीरासाठी फायदेशीर असणे आणि ते खाल्ल्याने डोळ्यांची दृष्टी वाढणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

दररोज बदाम खाल्ल्याने चष्म्याचा नंबर कमी होतो का?

दररोज सकाळी भिजवलेले बदाम खाल्ल्याने दृष्टी सुधारते आणि हळूहळू चष्म्याचा नंबर कमी होतो, असा अनेकांचा समज आहे. मात्र, या दाव्याला पुष्टी देणारे ठोस वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. चष्म्याचा नंबर प्रामुख्याने डोळ्यांच्या अपवर्तनाशी संबंधित दोषांमुळे येतो. यामध्ये दूरच्या वस्तू स्पष्ट न दिसणे (मायोपिया), जवळच्या वस्तू पाहताना अडचण येणे (हायपरोपिया) आणि दृष्टिवैषम्य (ॲस्टिग्मॅटिझम) यांचा समावेश होतो. या विकारांमध्ये डोळ्यांची रचना किंवा प्रकाशकिरण रेटिनावर केंद्रित होण्याच्या क्षमतेत बदल होतो. केवळ बदाम खाल्ल्याने डोळ्यांची रचना बदलत नाही. त्यामुळे चष्म्याचा नंबर कमी होईल, अशी अपेक्षा करणे योग्य नाही. पोषक घटकांनी समृद्ध आहार डोळ्यांचे सामान्य आरोग्य टिकवून ठेवण्यास मदत करतो. मात्र, त्यामुळे चष्म्याची गरज संपत नाही. बदामाचा आहारात समावेश करणे चांगले असले, तरी त्याला चष्म्याचा किंवा डॉक्टरांनी सुचवलेल्या उपचारांचा पर्याय समजू नये.

बदामामुळे डोळ्यांची दृष्टी सुधारते, या दाव्यात किती तथ्य?



बदामामध्ये डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त पोषक घटक असले, तरी त्याच्या सेवनाने दृष्टी सुधारते, या दाव्याचा वैज्ञानिक आधार तपासणे आवश्यक आहे. उपलब्ध संशोधनामध्ये प्रामुख्याने व्हिटॅमिन ई आणि इतर अँटिऑक्सिडंट्सची भूमिका, संतुलित आहार तसेच काही विशिष्ट नेत्रविकारांचा धोका आणि त्यांच्या प्रगतीचा अभ्यास करण्यात आला आहे. केवळ बदाम खाल्ल्याने दृष्टी सुधारते किंवा डोळ्यांचे आजार बरे होतात, असे अद्याप सिद्ध झालेले नाही. याशिवाय, पारंपरिक समजुती आणि आधुनिक वैद्यकीय संशोधन यांतील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. आयुर्वेदात बदामाला पौष्टिक आहार म्हणून महत्त्व दिले जाते. मात्र, बदाम, बडीशेप किंवा अन्य घरगुती मिश्रणामुळे चष्मा कायमचा उतरतो, अशा दाव्यांना विश्वासार्ह मानवी संशोधनाचा आधार असणे आवश्यक आहे.

डोळ्यांचा कोरडेपणा आणि थकवा कमी होतो का?

मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकाच्या पडद्याकडे दीर्घकाळ पाहिल्याने डोळ्यांमध्ये कोरडेपणा, जळजळ, जडपणा आणि धूसर दिसण्याचा त्रास होऊ शकतो. पडद्याकडे लक्ष केंद्रित करताना डोळ्यांची उघडझाप कमी होते. त्यामुळे डोळ्यांच्या पृष्ठभागावरील अश्रूंच्या थरावर परिणाम होतो. दीर्घकाळ पडद्याकडे पाहण्याची सवय डोळ्यांच्या कोरडेपणाच्या समस्येला कारणीभूत ठरू शकते. ही समस्या कमी करण्यासाठी २०-२०-२० नियम पाळा. म्हणजेच, दर २० मिनिटांनी सुमारे २० फूट अंतरावरील वस्तूकडे २० सेकंद पाहा. संगणक किंवा मोबाईल वापरताना नियमितपणे पापण्यांची उघडझाप करा. मोबाइल आणि संगणक डोळ्यांपासून योग्य अंतरावर ठेवा. पडद्याची चमकही आरामदायक ठेवा. सतत कोरडेपणा किंवा जळजळ जाणवत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने डोळ्यांचे थेंब वापरा. डोळ्यांत सतत वेदना, लालसरपणा, प्रकाशाचा त्रास किंवा धूसर दिसत असल्यास नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्या. बदामातील व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक घटक डोळ्यांचे सामान्य आरोग्य टिकवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. मात्र, दररोज बदाम खाल्ल्याने चष्म्याचा नंबर कमी होतो, दृष्टी अधिक तीक्ष्ण होते किंवा डोळ्यांचा कोरडेपणा पूर्णपणे बरा होतो, याचा ठोस वैज्ञानिक पुरावा नाही. त्यामुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी संतुलित आहार, नियमित नेत्रतपासणी आणि आवश्यकतेनुसार योग्य उपचार यांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे.

नाश्ता केल्यानंतर लगेच अंघोळ करताय?

नाश्ता केल्यानंतर लगेच अंघोळ करणे योग्य की अयोग्य, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. जेवणानंतर लगेच अंघोळ केल्यास पचनक्रियेवर परिणाम होतो, असा सर्वसाधारण समज आहे. आयुर्वेदातही अंघोळीमुळे शरीरातील रक्तप्रवाह पचनसंस्थेकडून त्वचेकडे वळतो आणि त्यामुळे अन्न पचण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो, असे मानले जाते. मात्र वैद्यकीय दृष्टिकोनातून निरोगी व्यक्तीने जेवणानंतर लगेच अंघोळ केल्यास पचनक्रिया बिघडते, असे सिद्ध झालेले नाही. तरीही, भरपेट जेवणानंतर लगेच अंघोळ केल्यास काही जणांना अस्वस्थता जाणवू शकते. यामागील कारणे आणि त्याचे शरीरावर होणारे परिणाम जाणून घेऊया...

अन्नपचनाची प्रक्रिया नेमकी कशी सुरू होते?

आपण अन्न खाण्यास सुरुवात करताच शरीरात पचनाची प्रक्रिया सुरू होते. तोंडातील लाळ अन्नाचे विघटन करण्यास मदत करते. त्यानंतर अन्न पोटात पोहोचते. तेथे पाचक रसांमध्ये मिसळून त्याचे पुढील पचन होते. पुढे हे अन्न लहान आतड्यात जाते. येथे बहुतांश पोषक घटकांचे शोषण केले जाते. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान पचनसंस्थेतील अवयवांना कार्य करण्यासाठी अधिक रक्तपुरवठ्याची आवश्यकता असते. त्यामुळे जेवणानंतर पोट आणि आतड्यांकडील रक्तप्रवाह नैसर्गिकरीत्या वाढतो. ही शरीरातील सामान्य प्रक्रिया आहे.





अंघोळ केल्याने पचनसंस्थेतील रक्तप्रवाह कमी होतो का?

जेवणानंतर पचनसंस्थेकडे रक्तप्रवाह वाढतो, हे खरे असले तरी अंघोळ केल्याने हा रक्तप्रवाह इतका कमी होतो की पचनक्रियेत अडथळा निर्माण होईल, याचा ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. आपले शरीर रक्ताभिसरणाचे नियमन अतिशय प्रभावीपणे करते. त्यामुळे सामान्य परिस्थितीत अंघोळ केल्याने पचनसंस्थेला होणारा रक्तपुरवठा थांबत नाही. परिणामी, जेवणानंतर लगेच अंघोळ केल्यास अन्नाचे पचन थांबते किंवा बिघडते, हा समज वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला नाही.

गरम पाण्याने अंघोळ केल्यास काय होते?

अतिशय गरम पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेच्या जवळील रक्तवाहिन्या प्रसरण पावतात. त्यामुळे काही वेळा रक्तदाब कमी होऊ शकतो. परिणामी, चक्कर येणे किंवा अशक्तपणा जाणवण्याची शक्यता असते. ज्यांचा रक्तदाब आधीपासूनच कमी आहे किंवा शरीरात पाण्याची कमतरता आहे, अशा व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. मात्र, सामान्य तापमानाच्या कोमट पाण्याने अंघोळ केल्याने पचनसंस्थेवर थेट विपरीत परिणाम होतो, असे सिद्ध झालेले नाही.

अपचन किंवा पोट जड होऊ शकते का?

जेवणानंतर पोट जड होणे, गॅस होणे किंवा अस्वस्थ वाटणे यामागे अनेक कारणे असू शकतात. अतिप्रमाणात अन्न खाणे, घाईघाईने जेवणे, आम्लपित्त किंवा आधीपासून असलेले पचनाचे विकार यांमुळे अशा समस्या उद्भवू शकतात. त्यासाठी प्रत्येक वेळी अंघोळीलाच जबाबदार धरणे योग्य नाही. मात्र, भरपेट जेवण केले असेल आणि आधीपासूनच पोट जड वाटत असेल, तर लगेच अंघोळ करण्याऐवजी काही वेळ विश्रांती घेणे अधिक सोयीचे ठरू शकते.

जेवणानंतर किती वेळाने अंघोळ करावी?

- हलका नाश्ता केला असल्यास : शरीराला कोणताही त्रास जाणवत नसेल, तर लगेच अंघोळ केल्याने नुकसान होते, असे सिद्ध झालेले नाही.
- भरपेट जेवण केले असल्यास : पोट भरल्यासारखे वाटत असेल, तर काही वेळ थांबून अंघोळ करणे अधिक आरामदायक ठरू शकते.
- अस्वस्थता जाणवत असल्यास : चक्कर येणे किंवा अशक्तपणा जाणवत असल्यास तातडीने अंघोळ करण्याचे टाळावे.

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/D मधील क्षेत्र ०.८३ हे. ही जमीन हैबती कोंडीबा देवदे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. २/११/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४०/E मधील क्षेत्र ०.९० हे. ही जमीन माधव इरन्ना यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

Change In Name

My old name is **Shaikh Mukhtar** which now I am changing as new name **Shaikh Mukhtar Khajaminya** hence forth my all correspondency will be done as per my new name please consider the same.

SING BY - SHAIKH MUKHTAR KHAJAMINYA AT POST KUNDALWADI BILOLI NANDED MAHARASHTRA 431711 Mo. No. 9766414421

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उन्नतीशील महिला मंडळ नांदेड संचालित सावित्रीबाई फुले शिशुगृह लोहा या संस्थेत दिनांक २५/४/२०२५ रोजी रेल्वे पोलीस स्टेशन नांदेड अंतर्गत रेल्वे पोलीस दूरक्षेत्र उमरी यांच्या मार्फत आलेले अनोळखी स्त्री जातीचे बाळ बालकल्याण समिती नांदेड यांच्या आदेशाने दाखल करून घेण्यात आले आहे. वय वर्षे ४. तरी सदरच्या शिशुचे नाव गौरी हिच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी मूल परत पाहिले असल्यास संस्थेशी संपर्क साधावा अन्यथा मूल नको आहे असे समजून मुलीच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

संपर्क
अधीक्षिका
सावित्रीबाई फुले शिशुगृह ज्योतीबा फुले औद्योगिक वसाहत
श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, लोहा
ता. लोहा, जि. नांदेड
मो. ९५१८३५२९८०

Change In Name

My old Name is **Shaikh Nuzhat Asalm** Which now I am Changing as New Name **Shaikh Nuzahat Shaikh Aslam** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: Amina Manzil Lalwandi Road Naigaon. Mobile No. 9545933401

टी. सी. हरवली

माझी रंजना गंगाधर मेटकर या नावाची चौथी पासची टी.सी. तरोडा नाका ते मालेगाव दरम्यान प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी. संपर्क पत्ता-रंजना गंगाधर मेटकर रा. मालेगाव, ता. अर्धापूर, जि. नांदेड मो. ७९९५८९४७४७

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/C मधील क्षेत्र ०.८३ हे. ही जमीन सामायिक हिश्याप्रमाणे सोपान मष्णाजी कामळे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहिरप्रगटन
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४७/२०२६
दत्तू पिता पोशट्टी चटलोड व इतर वि. निरंक

अर्जदार : १. दत्तू पिता पोशट्टी चटलोड वय - ५३ वर्षे,
२. भास्कर पिता दत्तराम चटलोड वय - २७ वर्षे,
३. प्रेमला भ्र. लक्ष्मण आडपोबोर्स वय - २५ वर्षे,
४. पुजा भ्र. प्रवीण सुदाम वय - २१ वर्षे,
अर्जदार क्र.१, २ रा. सगरोळी ता. बिलोली जिल्हा नांदेड
अर्जदार क्र.३ रा. अमदापुर ता. बोधन जिल्हा निजामाबाद, तेलंगना.
अर्जदार क्र.४ रा. पोतंगल ता. कोटगीर जिल्हा निजामाबाद, तेलंगना.

विरूध्द
निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **गंगामणी भ्र. दत्तू चटलोड** यांची अर्जदार क्र.१ हे पती आहेत, अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ व ४ या विवाहीत मुली आहेत,अर्जदार क्र.१,२ रा. सगरोळी ता. बिलोली जिल्हा नांदेड अर्जदार क्र.३ रा. अमदापुर ता. बोधन जिल्हा निजामाबाद, तेलंगना. अर्जदार क्र.४ रा. पोतंगल ता. कोटगीर जिल्हा निजामाबाद, तेलंगना येथे वास्तव्यास आहे. मयत **गंगामणी भ्र. दत्तू चटलोड** यांचा मृत्यु दिनांक **०५/०९/२०२६** रोजी कर्करोगाने त्यांचे राहते घर सगरोळी ता. बिलोली जिल्हा नांदेड झाला. मयत **गंगामणी भ्र. दत्तू चटलोड** यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाही. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **गंगामणी भ्र. दत्तू चटलोड** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १५/१२/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/C मधील क्षेत्र ०.८३ हे. ही जमीन सामायिक हिश्याप्रमाणे हुलाजी मष्णाजी कामळे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४०/C मधील क्षेत्र ०.८३ हे. ही जमीन सामायिक हिश्याप्रमाणे चंद्रभागा बाबुराव संबोड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४०/D मधील क्षेत्र ०.९० हे. ही जमीन हैबती कोंडीबा देवदे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/A मधील क्षेत्र २.९२ हे. ही जमीन जयश्री विनोद तुंबवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/A मधील क्षेत्र. १.५८ हे. ही जमीन नागेश विनोद तुंबवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक 140/C मधील क्षेत्र. ०.८३ हे. ही जमीन सामायिक हिश्याप्रमाणे शिवाजी मष्णाजी कामळे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/A मधील क्षेत्र २.९२ हे. ही जमीन जयश्री विनोद तुंबवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. २/११/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

जाहीर प्रगटन

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi ११००३३ यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १४१/A मधील क्षेत्र २.९२ हे. ही जमीन जयश्री विनोद तुंबवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासनू ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा, निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन.

दि. १६/९/२०२६

तर्फे
अॅड.बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर,
ता.भोकर, जि. नांदेड-४३१८०१
मो.८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED
डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

नांदेडमध्ये फायनान्स वसुलीवरून तणाव; कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि कर्जवसुलीला स्थगिती देण्यासाठी जीआर काढण्याची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीच्या मुद्द्यावरून तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली असून, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर फायनान्स कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि कर्ज-वसुलीला तात्पुरती स्थगिती देण्यासाठी शासन निर्णय (जीआर) काढण्याची मागणी करण्यात येत आहे.



सध्या जिल्ह्यात काही ठिकाणी फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयांमध्ये गोंधळ आणि तोडफोडीच्या घटना घडत आहेत. फायनान्स कंपन्यांमध्ये काम करणारे बहुतांश कर्मचारी हे सामान्य आणि शेतकरी कुटुंबातील असून, अनेक महिला कर्मचारीही या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे अशा घटनांमुळे कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, त्यांच्या कुटुंबांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

शेतीशी निगडित कर्जाबाबत शासनाने यापूर्वीच घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच इतर कर्जदारांच्या परिस्थितीचाही विचार करून वैयक्तिक कर्ज, व्यावसायिक कर्ज, गृहकर्ज व इतर पात्र कर्जाबाबत कर्जवसुलीला तात्पुरती स्थगिती देण्यासाठी शासनाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी समन्वय साधून आवश्यक शासन निर्णय किंवा नियमानुसार योग्य निर्देश जारी करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे कर्जदारांना दिलासा मिळेल आणि फायनान्स व बँकिंग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवरील तणाव कमी होऊन त्यांच्या सुरक्षिततेस मदत होईल. तसेच कार्यालयांमध्ये तोडफोड, धमकावणे व हिंसक प्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने आवश्यक संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात.

शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि फायनान्स कर्मचाऱ्यांच्या जीविताचे संरक्षण व्हावे, हीच आमची भूमिका आहे. शासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी विनंती बालाप्रसाद शिंदे, व्यंकटेश शिंदे आणि मंगेश शिंदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

वजिराबादमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; १५ जणांविरुद्ध गुन्हा, ३.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त



नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने स्मशानभूमीजवळ सुरू असलेल्या 'तिर्रट' जुगार अड्ड्यावर छापा टाकून १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी ६ दुचाकींसह ३ लाख ५८ हजार ३९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी रात्री गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक खंडू दर्शने आणि गुन्हे शोध पथकातील अंमलदार विलास कदम यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी रात्रीची गस्त घालत देगावचाळ परिसरात आले असता, गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, लिंगायत स्मशानभूमीच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेवर काही इसम गोलाकार बसून पैशावर 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत.

माहिती मिळताच पथकाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास सदर ठिकाणी छापा मारला. यावेळी जुगार खेळणाऱ्या ११ जणांना जागीच ताब्यात घेण्यात आले, तर चौकशीत हा जुगार अड्डा चालवणाऱ्या आणखी ४ जणांची नावे निष्पन्न झाली.

पोलिसांनी शेख नदीम शेख अब्दुल्ला (३१, रा. बरकतपुरा, वाघी रोड), सय्यद जुबेर सय्यद नवाबअली (२३, रा. खडकपुरा), बिरुसिंग कार्तसिंग रागी (वय ३५, रा. शहिदपुरा), ईरफान बेग समदानी बेग (वय ३१, रा. तेहरानगर), मोहम्मद जमिर अब्दुल रज्जाक (वय ३८, रा. गोवर्धनघाट टेकडी), महंमद शाकीर महंमद ताजोद्दीन (वय ४७, रा. नवीन हस्सापूर), शमशोद्दीन अमीरोद्दीन शेख (वय ४५, रा. मिलगेट, जेलरोड), सय्यद मोसीन सय्यद कासीम (वय ३०, रा. दुल्हेशाह रहेमान नगर), अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तार (वय ३०, रा. दुल्हेशाह रहेमान नगर), हरप्रीतसिंग कुलवंतसिंग चहल (वय ३०, रा. गुरुद्वारा गेट क्र. ४), भगतसिंग गुरुदयालसिंग ढिलो (वय ४७, रा. गुरुद्वारा गेट क्र. ४), तसेच अड्डा चालवणारे सय्यद नसीर (खडकपुरा), सय्यद फरहान (खडकपुरा), यासीन शेख (रेहमान नगर), युसूफखान युनूसखान (रेहमान नगर) यांना ताब्यात घेतले.

मंडप व्यावसायिकांसाठी खुशखबर! मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत मिळणार प्राधान्य

व्यवसायवृद्धी, कर्जसुविधा आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न; राज्यस्तरीय स्नेहमेळाव्यात आश्वासन

नांदेड (प्रतिनिधी) –जन्मापासून ते विवाह सोहळ्यापर्यंत तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये मंडप व्यावसायिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सेवा क्षेत्राचा अविभाज्य भाग असलेल्या या व्यवसायातून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मंडप व्यावसायिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत प्राधान्य देण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

नांदेड येथे आयोजित राज्यस्तरीय मंडप व्यावसायिक स्नेहमेळाव्यात राज्याच्या विविध भागांतून आलेल्या व्यावसायिकांशी संवाद



साधण्यात आला. यावेळी मंडप व्यवसायाचा विस्तार, आधुनिक साधनसामग्रीची उपलब्धता, आर्थिक अडचणी आणि व्यवसायासमोरील विविध प्रश्न याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मंडप व्यावसायिकांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असून, या माध्यमातून त्यांच्या व्यवसायवाढीला चालना मिळेल. तसेच बँकांकडून कर्जवाटप, एमएसएमई अंतर्गत व्यवसायवृद्धी आणि शासनाच्या विविध आर्थिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेण्यात येईल, असेही यावेळी आश्वासित करण्यात आले.

मंडप व्यावसायिक हा केवळ सजावट व मंडप उभारणी करणारा घटक नसून, हजारो कुटुंबांच्या रोजगाराचे साधन असलेला महत्त्वाचा घटक आहे. या क्षेत्रातील व्यावसायिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळाल्यास त्यांच्या व्यवसायाला नवी दिशा आणि आर्थिक स्थैर्य मिळेल.

नांदेड जिल्ह्यात फसवणुकीचे दोन गुन्हे दाखल; बँक कर्मचाऱ्याकडून २.४३ लाखांचा अपहार, तर एटीएम कार्ड बदलून १४ हजार लंपास

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या असून, दोन्ही प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुदखेड बँक कर्मचाऱ्याकडून २.४३ लाखांच्या फसवणुकीचा प्रकार पुढे आला आहे.

दि. ६ नोव्हेंबर २०२४ ते ३ मार्च २०२५ या कालावधीत मौजे पिंपळकौठा मगरे व इतर गाव, ता. मुदखेड येथे आरोपी नागेश शंकर शिंदे (रा. मांजरम) हा भारत फायनान्शियल इन्क्लुजन बँकेत कार्यरत असताना कर्जदारांकडून वसूल केलेली एकूण २ लाख ४३ हजार ६३६ रुपयांची रक्कम बँकेत जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी जवळ ठेवून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी बँक मॅनेजर फिर्यादी नितीन शिवाजीराव वाघमारे (वय ३०, व्यवसाय, नोकरी, भारत फायनान्शियल इन्क्लुजन बँक, शाखा मुदखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. २३१/२०२६, कलम ३१८(४), ३१६(४) BNS-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सपोनि राठोड करीत आहेत.

नायगाव-एटीएम कार्डची अदलाबदल करून १४ हजारांची फसवणूक

दि. २८ ते ३१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये नायगाव येथे फिर्यादी हे बॅलन्स चेक करत असताना दोन अनोळखी इसमांनी संगनमत करून फिर्यादीच्या हातातील एटीएमकार्डची अदलाबदल करून त्यांच्या कार्डचा वापर करून वेगवेगळ्या एटीएममधून १४ हजार रुपये काढून फसवणूक केली.

या प्रकरणी फिर्यादी शंकर धोंडीबा शिंदे (वय ५८, रा. मांजरम) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नायगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. २३९/२०२६, कलम ३१८(४), ३(५) BNS-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास हवालदार पवार करीत आहेत.

शारदाबाई हलबुर्गे यांचे निधन



नांदेड (प्रतिनिधी)– बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी शारदाबाई संतुकराव हलबुर्गे (८१) यांचे सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी आदमपुरात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे. पत्रकार संजय हलबुर्गे यांच्या त्या आई होत.

चंद्रकलाबाई गज्जलवार यांचे निधन



नांदेड (प्रतिनिधी)– देगलूर तालुक्यातील वळग येथील रहिवासी श्रीमती चंद्रकलाबाई विश्वनाथराव गज्जलवार यांचे वृद्धापकाळाने मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या ९५ वर्षांच्या होत्या.

श्रीमती चंद्रकलाबाई गज्जलवार यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी ११ वाजता वळग येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

युवासेनेच्या जिल्हाप्रमुखपदी डॉ. नवनाथ उर्फ बापू चव्हाण यांची नियुक्ती

लोहा (प्रतिनिधी)– शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नांदेड जिल्हा युवासेना प्रमुखपदी लोहा शहराचे भूमिपुत्र तथा माजी पं. स. सदस्य नवनाथ उर्फ बापू रोहिदास चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवनाथ उर्फ बापू रोहिदास चव्हाण हे शिवसेनेचे माजी नांदेड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण यांचे पुत्र आहेत. माजी आ. रोहिदास चव्हाण हे शिवसेनेचे १९८५ ते ९५ असे सलग १० वर्षे जिल्हाप्रमुख व नंतर १९९५ ते २००४ पर्यंत कंधार -लोहा मतदारसंघाचे आमदार होते.

नवनाथ उर्फ बापू चव्हाण हे माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या तालमीत वाढलेले कट्टर शिवसैनिक आहेत.



त्यांनी नांदेड जिल्हा नियोजन समिती सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे सिनेट सदस्य, लोहा पं. स. चे सदस्य, तसेच एक तरुण तडफदार कर्तव्यदक्ष शिवसैनिक म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल मातोश्रीने घेऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना जिल्हा प्रमुखपदी निवड केली आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जिल्हा परिषदेत ४ ते ६ नोव्हेंबर दरम्यान 'उमेद'चा दिवाळी महोत्सव

नांदेड (प्रतिनिधी) – 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला स्वयंसहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात ४ ते ६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दिवाळी महोत्सव व विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

या प्रदर्शनात महिला बचतगटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू, गृहउपयोगी साहित्य, विविध खाद्यपदार्थ, आकर्षक उत्पादने तसेच पारंपरिक दिवाळी फराळ विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे. प्रदर्शन दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या कौशल्याला व्यासपीठ मिळवून देणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, उत्पन्नात वाढ करणे आणि महिला उद्योजकतेला चालना देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

ग्रामीण महिलांनी मेहनतीने तयार केलेल्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी या दिवाळी महोत्सवाला आवर्जून भेट द्यावी आणि महिला बचतगटांच्या उत्पादनांसह पारंपरिक फराळाची खरेदी करावी. यामुळे महिला स्वयंसहाय्यता समूहांच्या आर्थिक सक्षमीकरणाला हातभार लागेल, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक परीक्षित यादव आणि उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक बालाप्रसाद जंगीलवाड यांनी केले आहे.

अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरूद्ध महावितरणची धडक कारवाई; नायगावात केबलांची होळी



नांदेड (प्रतिनिधी)– कृषीपंपधारक शेतकरी आणि घरगुती व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा करता यावा यासाठी महावितरणकडून अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरूध्द मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत १००९ आकडेबहाद्दर वीज चोरांवर कारवाई करण्यात येऊन आकडे टाकून वीज चोरीसाठी वापरण्यात आलेल्या हजारो मीटर केबलची होळी करण्यात आली.

ग्रामीणसह गावठाण भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे विजेचा वापर होत असल्याने अधिकृत वीज ग्राहकांना नाहक त्रास होत असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले. त्यामुळे महावितरणने अधिकृत ग्राहकांना अखंडित आणि सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी अनधिकृत वीज वापरकर्त्यांविरूध्द मोहीम सुरू केलेली आहे. ही मोहीम कृषी आणि अकृषी भागातही राबविण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२६ मध्ये राबविण्यात आलेल्या मोहिमेच्या तपशिलानुसार नांदेड जिल्ह्यातील देगलूर विभागात २६४, भोकर १६३, नांदेड ग्रामीण विभागात ७०० तर नांदेड शहर विभागात १७३ आकडे बहाद्दरांचे आकडे काढून त्यासाठी वापरण्यात आलेले हजारो मीटरर्स केबल जप्त करण्यात आले आहेत. काही ठिकाणी शेगड्या आणि हिटर्सही जप्त करण्यात आले आहेत.

देगलूर विभागात अनेक ठिकाणी वीज वाहिन्यांवर आकडे टाकण्यासाठी वापरण्यात आलेल्या केबलची होळी करून शेगड्या व हिटर फोडण्यात आले. महावितरणने राबविलेल्या या मोहिमेमुळे वाहिन्यांवरील विजेचा ताणही नियंत्रणात येत आहे.

नंदिग्राम एक्सप्रेसखाली येऊन ३५ वर्षीय व्यक्तीची आत्महत्या

भोकर ते बोरगाव दरम्यानची घटना; आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट

भोकर (प्रतिनिधी)– भोकर ते बोरगाव दरम्यान मंगळवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजून ४० मिनिटांच्या सुमारास नंदिग्राम एक्सप्रेसखाली येऊन एका ३५ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. साहेबराव चांदू दुबळे (वय ३५, मूळ रा. कामनगाव, हल्ली मुक्काम हनुमान नगर, भोकर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.



साहेबराव दुबळे हे भोकर येथील मार्केट परिसरात भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत होते. ते अत्यंत शांत स्वभावाचे असल्याने त्यांच्या परिचितांमध्ये त्यांची साधी व मनमिळाऊ व्यक्ती म्हणून ओळख होती.

घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे, पोलीस उपनिरीक्षक दिलीप जाधव यांच्यासह भोकर पोलीस ठाण्याचे कर्मचारी, रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मृतदेह ग्रामीण रुग्णालय, भोकर येथे आणण्यात आला. तेथे शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह अंत्यसंस्कारासाठी कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आला.

शेतकरी, दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी तहसील कार्यालयावर डफडे बजाव आंदोलन

किनवट (प्रतिनिधी)– शेतकरी आणि दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी किनवट तहसील कार्यालयावर डफडे बजाव आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांचे फार्मर आयडी, पोटखराबा, वर्ग-२ जमिनींचे प्रश्न तसेच दिव्यांग कल्याण निधीच्या विनियोगाबाबत मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

रीठा तांडा, धानोरा, परोटी परिसरातील सुमारे १७०० शेतकऱ्यांचे फार्मर आयडी, पोटखराबा नोंदी आणि वर्ग-२ जमिनींचे प्रश्न प्रलंबित असल्याने संघटनेने नाराजी व्यक्त केली. तसेच ग्रामपंचायतींच्या दिव्यांग कल्याण निधीच्या मागील पाच वर्षांतील खर्चाची चौकशी करून हिशेब सार्वजनिक करावा,



अशी मागणी करण्यात आली. आमदार स्थानिक विकास निधीतून दिव्यांगांसाठी मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च आणि लाभार्थ्यांची माहितीही मागण्यात आली.

पैनगंगेच्या पाण्यावर चारा उत्पादनाचा प्रस्ताव

परोटी तांडा परिसरातील पडीक जमिनीवर पैनगंगा नदीच्या उपलब्ध पाण्याचा वापर करून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून चारा उत्पादन सुरू करण्याचा अभिनव प्रस्ताव संघटनेने मांडला. यासाठी संबंधित विभागांनी संयुक्त स्थळ पाहणी करून सिंचन, वीजपुरवठा, चारा बियाणे व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

शेतकरी व दिव्यांगांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता ठोस कार्यवाही करून लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील यांनी केली. नायब तहसीलदार चंद्रशेखर सहारे यांनी निवेदन स्वीकारले.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com